# महाराष्ट्र कॉंग्रेस प्रकाशन

श्री. धनंजयरावं गाडगीळ
यांस सप्रेम
बापुसाहेब गुप्ते.

७

# अन्नधान्यप्रश्न.

लेखक

भालचंद्र महेश्वर गुप्ते

एम्. ए., एल्एल्. बी., एम्. एल्. ए.

आवृत्ति १ ली. ]                    किं. ६ आणे.                    [ १९४५



महाराष्ट्र काँग्रेस प्रकाशन....७

# अन्नधान्यप्रश्न

## हिंदुस्थानची अन्नान्नदशा

आसामच्या मोहिमेंत विजय मिळाल्यानंतर पार्लमेंटमध्यें भाषण करीत असतां चर्चिल यांनीं अशी प्रौढि मिरविली कीं, साम्राज्याच्या ढालीमुळें हिंदुस्थानाचें परचक्रापासून निवारण झालें. या यशामध्यें हिंदुस्थानचें रक्त, घाम आणि पैसा यांचा हिस्सा किती हा प्रश्न आपण बाजूला ठेवूं; तरी सुद्धां चर्चिल यांना असें सांगावेंसें वाटतें कीं, "चर्चिलसाहेब, साम्राज्यानें लादलेल्या या युद्धांत, हिंदुस्थानची काय अन्नान्नदशा झाली आहे ती एकदां पहा, आणि नंतर साम्राज्याच्या ढालीचीं जीं कांहीं स्तुतिस्तोत्रें गावयाचीं असतील तीं गा." साम्राज्याच्या सैनिकहानीचे १९४५ फेब्रुवारीअखेरचे जे अधिकृत आंकडे प्रसिद्ध झाले आहेत त्यावरून असें दिसतें कीं, तोंपर्यंत सर्व रणांगणांवर व लष्कर, आरमार आणि हवाईदल, या सर्व शाखा मिळून इंग्लंडचे एकंदर ६,८५,८३८ सैनिक कामास आले. हे सर्व मेले असा अर्थ नव्हे. यांतील २,१६,२८७ मृत व ३०,९६७ बेपत्ता, २,५५,१४३ जखमी व १,८३,२४२ कैदी असा तपशील आहे. यांशिवाय सामान्य नागरिकांपैकीं सुमारें साठ हजार मेले व ८५ हजार जखमी झाले. म्हणजे ज्या लढाईमध्यें इंग्लंडच्या अगदीं जिवावर बेतलें होतें, अशी लढाई त्रिखंडांत लढवून इंग्लंडचे फार तर ४-४॥ लाख लोक सर्वस्वीं कामास आले, आणि ज्या लढाईमध्यें हिंदुस्थानचें अगदीं सरहद्दीवरच पर-

चक्रापासून निवारण झालें, त्या लढाईमध्यें हिंदुस्थानांतील फक्त एकाच प्रांतांत—जवळ जवळ इंग्लंडइतक्याच लोकसंख्येच्या प्रांतांत—कमींत कमी पंधरा लाख लोक अन्नावांचून तडफडून मेले !

वरील १५ लाखांचा अंदाज हा सर्वांत कमी अंदाज आहे. त्यापूर्वींचे अंदाज ३५-५० लाखांपर्यंत गेलेले होते. परंतु वरील १५ लाखांचा आंकडा हा बंगाल-दुष्काळाची चौकशी करण्याकरितां साम्राज्य सरकारनें नेमलेल्या वुडहेड कमिशननें ठरविलेला असल्यामुळें, आतां निदान त्या आंकड्यां-विषयीं शंका घेण्याचें कारण नाहीं. हा झाला मृत्यूंचा आकडा; पण केवळ त्यावरून बंगालमधील गरीब जनतेनें—विशेषतः खेडेगांवांतील जनतेनें—कशा प्रकारच्या यमयातनांतून दिवस काढले याची पूर्ण कल्पना येत नाहीं. भात हें लोकांचें मुख्य अन्न; अशा स्थितींत नेहमीं साधारण ४ रुपये मण किंमत असणारा तांदूळ ८० ते १०० रुपये मण इतका महाग झाला ! नफेबाजी, लांचलुचपत, काळाबाजार यांना ऊत आला. भुकेनें व्याकूळ होऊन हजारों कुटुंबें देशोधडीला लागलीं. नवरा—बायको, आई—बाप व मुलें यांची ताटातूट झाली. असल्या दारुण परिस्थितींत सांपडलेल्या दीन अबलांच्या असहायतेचा फायदा घेऊन कांहीं नरपशूंनीं त्यांच्या पातिव्रत्यावर घाला घातला. तांदळाच्या दोन कणांच्या आशेनें खेड्यांतील भुकेल्यांची कलकत्याकडे रीघ लागली. शेंकडों लोक तेथपर्यंत न पोहोंचतां वाटेंतच रस्त्यांच्या कडेला मरून पडले. कलकत्याच्या रस्त्यांतहि बेवारशी प्रेतांचा खच पडूं लागला ! इतक्या हालअपेष्टांतून जे धर्मार्थ अन्नछत्रापर्यंत जाऊन पोहोंचले त्यांना काय मिळत होतें ? सबंध दिवसाला बाजरीची फक्त २ छटाक कणेरी ! १९४३ च्या नोव्हेंबर महिन्यांत अशा तऱ्हेच्या अन्नछत्रांत दररोज २१लाख लोक कसाबसा जीव धरून होते. त्याच महिन्यांत खेड्यांतील सुमारें २॥ लाख लोकांना दररोज फुकट मिळणाऱ्या तीन छटाक शिध्यावर गुजराण करावी लागत होती. कलकत्त्यांतील कचरापेट्यांतून अन्नाचे दुर्मिळ कण शोधून काढणाऱ्या भिकाऱ्यांचें दृश्य प्रत्यहीं दिसत होतें. इतक्या यातनांतून वांचलेले हाडांचे सांपळे लवकरच मलेरियाच्या व कॉलऱ्याच्या साथींना हजारोंनीं बळी पडले ! बंगालच्या पराकाष्ठेच्या

सहनशीलतेचें मात्र आश्चर्य वाटतें. दुष्काळानें इतका कहर उडविला असूनहि बंगालमध्यें कुठें दुकानांची लुटालूट झाल्याचें ऐकिवांत नाहीं. बिचाऱ्या भूकबळींनीं आपल्या उपाशी पोटांतील आग अगदीं मिटल्या तोंडांनीं सहन केली. बंगालइतका भीषण दुष्काळ इतर प्रांतांत झाला नाहीं तरी तेथील लोकांचे काय कमी हाल झाले किंवा होत आहेत ? हिंदुस्थानाला दुष्काळांची पुष्कळ दिवसांची ओळख आहे; परंतु इतक्या मोठ्या व्यापक प्रमाणावर जवळजवळ सबंध राष्ट्राचे अन्नाच्या बाबतींत हाल झाले असा दाखला आपल्या इतिहासांत सांपडावयाचा नाहीं. अन्नधान्यांच्या किंमती तिपटीच्यावर गेल्या. (घाऊक किंमतींच्या सरासरीचा आंकडा ३११ पर्यंत गेला.) त्या २॥ पटीच्या आसपास तर किती तरी काळ टिकून आहेत. प्रत्यक्ष पडणारी काळ्याबाजारांतील किंमतीची सरासरी यापेक्षां पुष्कळच जास्त असेल. १९४२ व १९४३ सालीं झपाट्यानें वाढणाऱ्या महागाई व टंचाईमुळें बहुजनसमाज अन्नाला मोताद होऊं लागला. साहजिकच जिकडे तिकडे अस्वस्थता उत्पन्न झाली. कित्येक ठिकाणीं धान्यलुटीच्या दंगली होण्यापर्यंत पाळी आली. धान्यांच्या दुकानांसमोर लांबच लांब रांका दिसूं लागल्या. मुंबईत कित्येक वेळां त्यांत ५००-७०० माणसें दिसत होतीं. दुकान उघडण्याच्या पूर्वीपासून तासचे तास उन्हातान्हांत, पावसांत उभे राहूनहि आपला नंबर लागण्यापूर्वीच दुकानांतील माल संपल्याचा संतापजनक अनुभव लोकांना वारंवार येऊं लागला व त्यामुळें सार्वजनिक शांततेस धोका उत्पन्न झाला. रेशनिंगनें परिस्थिति आटोक्यांत आली. परंतु रेशनिंगमधील धान्य अपुरें, किडकें, गदळमिश्रित व निकृष्ट प्रतीचें. सरकारनें अलीकडे ठरविलेलें किमान रोजीं एक पौंडाचें माप पुण्यासारख्या शहरींहि अद्यापि पदरांत पडत नाहीं, मग खेडेगांवांतील लोकांचे हाल काय पुसावे ? अलीकडच्या काळापर्यंत पुणें जिल्ह्यांत व इतर ठिकाणीं माणशीं आठवड्यास फक्त एक शेर धान्य दिलें जात होतें; व तें मिळविण्याकरितां त्यांना ५।५ मैल जाऊन दोन दोन दिवस मोडावे लागत. रत्नागिरी जिल्ह्यांत अद्यापीहि खेड्यांतील दुकानांना १५–१५

दिवस माल मिळत नाहीं. ज्या स्थानिक धान्यावर लोकांचा पिंड पोसलेला, नेमकें तेंच धान्य त्या भागांत मिळत नाहीं. उदाहरणार्थ, गुजरसारख्या बाजरी-भागांत ज्वारीचें रेशन. वहातुकीची कमतरता असतां हें कसें घडतें तेंच कळत नाहीं. यांत शेतकऱ्यांचे तर विशेषच हाल. त्यांनीं स्वतःच्या शेतांत मोठ्या कष्टानें पिकविलेल्या तांदुळाचा एक कण सुद्धां, सणावारी त्यांच्या मुलाबाळांच्या पोटांत घालण्याकरितां त्याजजवळ ठेवलेला नाहीं असा अनुभव अनेक ठिकाणीं येतो. अपुऱ्या व अनारोग्यकारक धान्यामुळें व कडधान्य, हुलगा, रताळीं वगैरेंवर गुजराण केल्यामुळें खरूज इत्यादि कातडीच्या रोगांची वाढ झालेली दिसते. दुधाची तर गोष्टच बोलावयास नको; पण साधा भाजीपाला सुद्धां दुर्भिळ. बटाटे खावयाचे तर लष्करांतच नांव दाखल केलें पाहिजे अशी परिस्थिति कित्येक दिवस होती. मोठमोठ्या शहरांत सुद्धां गुळाच्या चहाचा प्रसंग. खुद्द साखरेच्या कारखान्यांत काम करणाऱ्या लोकांना जर माणशीं आठवड्याला फक्त २॥ तोळे साखर तर खेडेगांवांना काय जास्त मिळणार ? आणि हे सर्व हाल निसर्गाच्या कोपामुळें नाहींत. हा मनुष्यनिर्मित युद्धजन्य दुष्काळ आहे. प्रामुख्यानें सरकारचा हलगर्जीपणा व कार्यक्षमतेचा अभाव यांचा हा प्रसाद आहे. साम्राज्याची ढाल ही अशी आहे. तिनें परचक्रापासून हिंदुस्थानचें रक्षण केलें हें खरें; परंतु ती ढाल एवढी प्रचंड आहे कीं, तिच्या ओझ्याखालीं गुदमरून जाऊन खिचाऱ्या हिंदुस्थानचे प्राण कासावीस झाले आहेत; व " परमेश्वरा, या ढालीपासूनच आमचें रक्षण कर " असा आक्रोश करण्याचा प्रसंग त्याच्यावर आला आहे.

### सध्यांच्या व नेहमींच्या दुष्काळांतील फरक.

पावसाच्या अनिश्चिततेमुळें हिंदुस्थानांत कोठें ना कोठें तरी लहानमोठ्या टापूंत दुष्काळ नेहमींच असतो. अतिवृष्टि, अनावृष्टि किंवा अकालीं वृष्टि या थोड्याबहुत प्रमाणांत हिंदुस्थानच्या वांट्याला नेहमीं ठेवलेल्याच आहेत. परंतु इरिगेशन व रेल्वेची वाढ व सरकारी कारभाराचा पद्धतशीरपणा यांमुळें अलीकडे २०।२५ वर्षे या दुष्काळांच्या परिणामांची तीव्रता पुष्कळशी कमी झाली होती. इरिगेशनमुळें

पावसाच्या अनिश्चिततेला आळा बसत होता. एखाद्या टापूंत अवर्षण झाल्यास वाहतुकीची अडचण नसल्यामुळें व व्यापार खुला असल्यामुळें जरूर त्या अधिक धान्याची आयात बहुधा व्यापारी पद्धतीनेंच होत असे. शिवाय हालअपेष्टांच्या कधीं अधिक तीव्रतेप्रमाणें देशाच्या इतर भागांतील जनतेच्या औदार्याचा ओघ साहाजिकच तिकडे वळत असे. अशा परिस्थितींत दुष्काळग्रस्त बहुसंख्य जनतेला धान्यपुरवठा करण्याची जबाबदारी प्रायः सरकारवर पडत नसे. त्यांना फक्त हें धान्य विकत घेण्याचें साधन म्हणून कामधंद्याचा पुरवठा करावा लागत असे; व त्याप्रमाणें सरकारकडून दुष्काळी कामें निघत असत. सध्यांच्या दुष्काळाचें स्वरूप अगदीं निराळें आहे. काळ्या बाजारांत वाटेल त्या किंमतीस पदार्थ घेऊं शकणाऱ्या मूठभर अतिशय श्रीमंत लोकांखेरीज इतरांना जवळ पैसा असूनहि आपला नेहमींचा आहार घेतां येत नाहीं. म्हणजे सध्यां कामधंद्याची अगर पैशाची कमतरता नसून धान्याचीच टंचाई आहे. वर सांगितल्याप्रमाणें धान्याची ही कमतरता अवर्षणामुळें झालेली नाहीं. बंगाल्यांत १९४३च्या भयंकर दुष्काळापूर्वी १९४२ सालीं एक मोठें वादळ झालें. त्यांत धान्याचा नाश झाला. त्याचा थोडा परिणाम पुढील दुष्काळावर झाला असावा. हा अपवाद सोडला तर सध्यांची देशांतील अन्नधान्यपरिस्थिति निसर्गाच्या कोपामुळें उत्पन्न झाली असें म्हणतां यावयाचें नाहीं. उलट अलीकडे २।३ वर्षें पावसानें खैर केली म्हणूनच बरें झालें. नाहीं तर कितीतरी भीषण परिस्थिति आपल्या नशिबीं आली असती. सबब सध्यांचा दुष्काळ हा मनुष्यानिर्मित आहे व तो लढाईमुळें उत्पन्न झाला आहे. साहाजिकच त्याची व्याप्ति अवर्षणाच्या दुष्काळाप्रमाणें एखाद्या टापूपुरतीच मर्यादित नसून ती देशभर पसरली आहे. बंगाल्यांत घडलें त्याप्रमाणें कांहीं विशिष्ट कारणामुळें एखाद्या प्रांतांत अगर टापूंत त्याची तीव्रता जास्त भासते एवढेंच. अशा रीतीनें सध्यांच्या दुष्काळाचें स्वरूप नेहमींच्या दुष्काळापेक्षां फारच निराळें आहे.

## दुष्काळाची पार्श्वभूमि

परंतु ही शोचनीय अवस्था लढाईच्या कारणानें उत्पन्न झाली

असली तरी त्याच कारणांनीं इतरत्र कोठेंहि बसला नाहीं इतका जबरदस्त तडाखा हिंदुस्थानांतच कां बसला ? याचें उत्तर हेंच कीं, सरकारच्या हलगर्जीपणामुळें हिंदुस्थानांतील अन्नधान्यपरिस्थिति ही नेहमींचीच असमाधानकारक असून लढाईपूर्वीहि ती हळू हळू बिघडतच चालली होती. त्यामुळें तिच्यांत कोणत्याहि अकल्पित कारणांचा धक्का सहन करण्याची ताकदच राहिलेली नव्हती. हिंदुस्थानांतील बहुसंख्य लोक हे नेहमींच उपासमारीच्या दारीं बसलेले असतात. आधुनिक आहारशास्त्राप्रमाणें माणसाच्या अन्नांत, प्रोटीन, कार्बोहायड्रेट, फॅट, क्षार, व्हिटॅमिन् वगैरे घटकांचें योग्य तें प्रमाण असल्याशिवाय तो आहार पुष्टिवर्धक व आरोग्यदायक होऊं शकत नाहीं. हिंदुस्थानांतील निरनिराळ्या प्रांतांतील निरनिराळ्या वर्गांच्या आहाराची तज्ज्ञांनीं छाननी करून असा निर्णय दिला आहे कीं, वरील दृष्टीनें हे बहुतेक सर्व आहार सदोष आहेत. विशेषतः दुधासारख्या पूर्णान्नाची कमतरता हा हिंदुस्थानांतील आहारांचा एक प्रमुख दोष आहे. परंतु चौरस व सकस अशा आहाराची कसोटी बाजूला ठेविली तरी बहुसंख्य जनतेला एकांगी का होईना, पण पोटभर अन्न जर मिळत असतें तरीसुद्धां थोडेंबहुत समाधान मानण्याला जागा होती. सर जॉन मेगॉ या नांवाच्या सरकारी अधिकाऱ्यांनीं १९३३ सालीं आरोग्याच्या दृष्टीनें हिंदुस्थानांत बऱ्याच मोठ्या प्रमाणावर पाहणी केली. त्यावरून अन्नधान्याच्या बाबतींत त्यांनीं असा निष्कर्ष काढला कीं, हिंदुस्थानांत फक्त ३९ टक्के लोकांना चांगला आहार मिळतो. ४१ टक्के लोकांची या बाबतींत बरीच वाईट स्थिति आहे व २० टक्क्यांची तर अतिशयच वाईट आहे. शिवाय हें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, ही आंकडेवारी पुढारलेल्या युरोपीय राष्ट्रांतील आहाराच्या मानानें पुष्कळच कमी दर्जाची कसोटी लावून आलेली आहे. त्या राष्ट्रांची कसोटी लावल्यास हिंदुस्थानांतील परिस्थिति किती तरी अधिक निकृष्ट ठरेल ! डॉ. अक्रॉइड हे हिंदुस्थानांतील आहारविषयक एक सुप्रसिद्ध तज्ज्ञ आहेत. त्यांनींहि वेळोवेळीं पहाणी करून कांहीं अंदाज काढले आहेत. हिंदुस्थानांतील फार मोठ्या वर्गाची उपासमार होत आहे असा त्यांचा निष्कर्ष आहे, पण ते

स्पष्ट आंकडे देण्यास नाखुष आहेत. कारण त्यांच्या मतें हिंदुस्थानांत या विषयावर खात्रीलायक अशी माहिती उपलब्ध नाहीं. केलेली पाहणी केवळ चांचणी स्वरूपाची असते व त्यावरून निश्चित आंकडेवार सिद्धांत मांडणें धोक्याचें आहे. हा त्यांचा इषारा जमेस धरून त्यांचे अंदाजी आंकडे विचारांत घेण्यास हरकत नाहीं. त्यांच्या मतें हिंदुस्थानांतील सुमारें ३० टक्के लोक क्षुधेच्या व्याकुळतेनें (Actual hunger) पीडित असे आहेत. याच्या वरचा वर्ग सुमारें २५ टक्के-पर्यंतचा असा आहे कीं, पोटाची खळगी कशी तरी भरण्याइतकी त्यांची सांपत्तिक स्थिति आहे; परंतु रोगाचा प्रतिकार करण्याइतकें तरी त्राण ज्यामुळें येईल असा कमींत कमी दर्जाचा आहारसुद्धां घेणें त्यांना परवडत नाहीं. अन्नाचें परिमाण मोजण्याकरितां शास्त्रज्ञांनीं एक माप ठरविलें आहे; तें अन्नाच्या उष्णता उत्पन्न करण्याच्या शक्तीवरून ठरविलें आहे. त्याला 'कॅलरी' म्हणतात. साधारणतः एक शेर पाणी एक डिग्रीनें गरम करण्याला जेवढी उष्णता लागेल तिला 'कॅलरी' म्हणतात. हिंदुस्थानांतील परिस्थिति लक्षांत घेऊन असें ठरविण्यांत आलें आहे कीं, येथें साधारणतः माणशीं २८०० कॅलरी अन्न रोज मिळालें पाहिजे. अर्थात् वर लिहिल्या-प्रमाणें खरा आरोग्यदायक व पुष्टिवर्धक आहार म्हणजे या २८०० कॅलरी, धान्य, दूध, भाजीपाला, फळफळावळ वगैरे निरानिराळ्या तऱ्हेच्या अन्नप्रकारांनीं प्रमाणशीर भरून निघाल्या पाहिजेत. तुम्ही २८०० कॅलरी तांदूळ, गहूं वगैरे नुसतें धान्यच खाल्लें तर भूक मरेल; परंतु तो कांहीं खरा चौरस व सकस आहार नव्हे. चौरस व सकस अन्नाचा प्रश्न बाजूला ठेवला व निदान २८०० कॅलरी अन्न रोज हिंदुस्थानांतील लोकांना लढाईच्या पूर्वी तरी मिळत होतें कां हें पाहिलें, तरी वर दिलेल्या निष्कर्षांना पुष्टीच मिळते. प्रा. राधाकमल मुकर्जी यांच्या १९३५ सालच्या परिस्थितीच्या अंदाजाप्रमाणें सरासरी माणशीं दररोज २३७७ कॅलरी अन्न मिळत असे व त्यापेक्षां अलीकडच्या श्री. मसानी यांच्या अंदाजाप्रमाणें माणशीं २००० कॅलरी अन्न मिळतें.

यांपैकीं श्री. मसानी यांचा अंदाजच अधिक विश्वसनीय मानला पाहिजे. कारण प्रा. मुकर्जी यांनीं १९३१ च्या खानेसुमारीच्या आंकड्यां-

वरून सरासरी काढली असली पाहिजे व ती खानेसुमारी त्यावेळच्या असहकाराच्या चळवळीमुळें बऱ्याच ठिकाणीं बरोबर झाली नाहीं हें प्रसिद्धच आहे. १९३१ चा अपवाद सोडला तर अलिकडील खानेसुमाऱ्यांचे आंकडे साधारणतः खात्रीलायक समजण्यास हरकत नाहीं. परंतु अन्नपरिस्थितीसंबंधीं हिंदुस्थानांतील इतर आंकड्यांसंबंधीं मात्र असें स्पष्ट नमूद केलें पाहिजे कीं, हे सर्व आंकडे केवळ ठोकळ अंदाजी स्वरूपाचे आहेत हा डॉ. अक्रॉइड यांचा वर दिलेला इषारा सर्वत्र लागू आहे. हिंदुस्थानांतील कारभाराचा मागासलेपणा शाबीत करणाऱ्या अनेक गोष्टींपैकीं ही एक गोष्ट आहे कीं, हा शेतकीप्रधान देश असूनहि या देशांतील शेतीच्या उत्पादनाचे खात्रीलायक आंकडे अद्यापि उपलब्ध नाहींत. कित्येक संस्थानांतील माहिती तर मुळींच उपलब्ध नाहीं. जे आंकडे आहेत ते ठोकळ अंदाज आहेत. ज्या कमिटीच्या अहवालावर सध्यांचें अन्नधान्यविषयक धोरण आधारलेलें आहे त्या ग्रेगरी कमिटीच्या अहवालांत या बाबतींतील अनेक दोष तपशीलवार नमूद करण्यांत आलेले आहेत. दोन ठिकाणच्या सरकारी आंकड्यांतहि मेळ बसत नाहीं. उदाहरणार्थ, ग्रेगरी कमिटीनें मुंबई प्रांताचें एकदल धान्य व हरभरा यांची वार्षिक पैदास ४६॥ लाख टन दिली आहे. पण पिकांचे अहवाल पाहिल्यास ही पैदास ३२—३३ लाखांच्यावर जात नाहीं. ही सर्व कमतरता लक्षांत घेतली तरी सुद्धां हें निर्विवाद आहे कीं, या आंकड्यांवरून निघणाऱ्या सिद्धांतांची दिशाच चुकीची आहे असें म्हणतां यावयाचें नाहीं. ठोकळ मानानें कां होईना, ते सिद्धांत बरोबर आहेत. आणि म्हणून वरील आंकड्यांवरून हिंदुस्थानांत अन्नाचा नेहमींचाच तुटवडा किती आहे हें आपल्या लक्षांत येईल.

आतांपर्यंत सर्वसामान्य अन्नपरिस्थितीचें विवेचन केलें; परंतु प्रामुख्यानें ज्याचा आपणांला या पुस्तकांत विचार करावयाचा आहे तो अन्नधान्याचा प्रश्न घेतला तरी हीच रडकथा ऐकावयास येते. आहारांत दूध, माजीपाला, फळफळावळ वगैरे इतर पदार्थ पुरेसे असले तर तांदूळ, गहूं, ज्वारी, बाजरी यांसारख्या एकदल धान्याचें रोजचें माणशीं प्रमाण १५ ते २० औंस असलें पाहिजे. याप्रमाणें आवश्यक असलेल्या धान्याची व उपलब्ध

धान्याची तुलना केल्यास दरसाल सुमारें ५० ते ८० लाख टन तूट आढळून येईल. याशिवाय कडधान्याचें प्रमाण माणशीं दररोज निदान ३ औंस असलें पाहिजे. त्याचीहि वार्षिक तूट जवळ जवळ २० लाख आहे. शास्त्रीय कसोटीच्या मोजणीऐवजीं प्रत्यक्ष आयातनिर्यातीची वस्तुस्थिति विचारांत घेतली तरी अन्नधान्याच्या बाबतींत हिंदुस्थान हा तुटीचा देश आहे. लढाईच्या पूर्वीच्या दोन वर्षांचे आंकडे पाहिले तर या दोन्ही सालीं अनुक्रमें अंदाजें ११॥ व १२॥ लाख टन तांदुळाची निव्वळ आयात करावी लागली. आपला मुंबई प्रांत हाहि तुटीचा प्रांत आहे. १९३८–३९ ते ४०–४१ या सालांच्या सरासरीवरून पाहतां आपणाला दरसाल अंदाजे ४$\frac{1}{3}$ लाख टन तांदूळ, २ लाख टन गहूं व १। लाख टन ज्वारी-बाजरी व हरभरा इतक्या धान्याची निव्वळ आयात करावी लागते.

गेल्या २५।३० वर्षांत हिंदुस्थानांत लोकसंख्येची ज्या प्रमाणांत वाढ झाली आहे त्या प्रमाणांत अन्नधान्याच्या पुरवठ्यांत झाली नाहीं. प्रा. राधाकमल मुकर्जी यांनीं लोकसंख्या व उपलब्ध अन्नधान्य–पुरवठा यांची १९१०–११ ते १९३७–३८ या मुदतीची पहाणी केली आहे. पहिल्या पांच वर्षांची सरासरी हें आरंभस्थान धरून पुढें दरसाल लोकसंख्या व अन्नपुरवठा यांची शेकडेवारी काढली आहे. सुरवातीचे दोन्ही १००, १०० असे आंकडे धरले तर १९३०–३१ पर्यंत २।४ वर्षें खेरीजकरून पुरवठ्याचा आंकडा लोकसंख्येच्या आंकड्यापेक्षां सुमारें १२ ते २४ टक्क्यांनीं वर होता. पुढें मात्र झपाट्यानें घसरगुंडी लागून १९३७–३८ सालीं तर तो लोकसंख्येच्या आंकड्याच्या खालीं ७ टक्क्यांनीं गेला. (लोकसंख्या १२५, पुरवठा ११८) यावरून लढाईपूर्वींच लोकसंख्येचा भार अन्नधान्यपुरवठ्यावर पडून परिस्थिति कशी निकृष्ट झाली होती हें समजून येईल.

दूध, भाजीपाला, फळफळावळ, अंडीं हीं संरक्षक अन्नें समजलीं जातात. त्यांतहि दुधाचा प्रश्न हिंदुस्थानांत अत्यंत जिव्हाळ्याचा आहे.

या देशांतील बहुसंख्य लोकांना मांसाहार निषिद्ध नसला तरी या देशाच्या विशिष्ट परिस्थितीमुळें ( घनदाट वस्ती व दारिद्र्य ) तो त्यांचा नेहमींचा आहार होऊं शकत नाहीं. आहारांत प्रोटीन, फॅट वगैरेंचें योग्य तें प्रमाण असलें पाहिजे हें वर सांगितलेंच आहे. परंतु त्यांतहि वनस्पतिजन्य प्रोटीन व फॅटपेक्षां प्राणिज प्रोटीन व फॅट यांचें विशेष महत्त्व आहे; व मांसाहाराच्या अभावीं हे पदार्थ मिळण्याचें दूध हें एकच चांगलें साधन आहे. या दृष्टीनें वास्तविक माणशीं दररोज निदान १५–१६ औंस दूध अगर लोणी, तूप वगैरे दुधाचे पदार्थ पोटांत गेले पाहिजेत. इतर सुधारलेल्या राष्ट्रांच्या मानानें हें प्रमाण सुद्धां किती तुटपुंजें आहे हें खालील आंकड्यावरून कळून येईल:—कॅनडा ५८ औंस, ब्रिटन ४३ औंस व अमेरिका ३६ औंस. १९४३ सालीं दोस्त राष्ट्रांची एक अन्न-परिषद अमेरिकेंत भरली होती. तिच्या शिफारशीप्रमाणें रोज २१ औंस दूध प्रत्येकाला मिळालें पाहिजे. परंतु आपली आजची सरासरी फक्त ४॥ ते ५ औंस आहे; आणि ही सरासरी आहे हें लक्षांत ठेविलें पाहिजे. शिवाय प्रांताप्रांताच्या सरासरींतहि फार विषमता आहे. १९४३ मधील आंकड्याप्रमाणें सिंधची रोजची सरासरी १८ औंस, मुंबईची ५॥ औंस तर आसामची फक्त १·३ औंस आहे. याचा अर्थ फार मोठ्या वर्गाला दूध जवळ जवळ मुळींच मिळत नाहीं असा आहे. या दृष्टीनें १५–१६ औंस सरासरी हा फारच लांबचा पल्ला. सबब व्यवहार्यतेकडे नजर देऊन रोज निदान माणशीं ८ औंस हें प्रमाण ठरविण्यांत आलें आहे.

## महाराष्ट्रांतील परिस्थिति

येणेंप्रमाणें सबंध देशाची परिस्थिति स्थूलमानानें समजून घेतल्यानंतर महाराष्ट्रांतील ११ जिल्ह्यांची परिस्थिति अधिक तपशीलवार रीतिनें माहीत असणें उपयुक्त आहे. सबब त्यासंबंधीं आंकडे खाली देत आहे:

## अन्नधान्याचे आंकडे.

( आंकडे हजार टनांचे आहेत )

| | जिल्हा | गरज | उत्पादन | तूट— अगर जास्त+ |
|---|---|---|---|---|
| (१) | पश्चिम खानदेश | १७१ | २०३ | + ३२ |
| (२) | पूर्व खानदेश | २५० | २०० | — ५० |
| (३) | नाशीक | २१० | २८८ | + ७८ |
| (४) | अहमदनगर | २१५ | २८१ | + ६६ |
| (५) | पुणें | २५५ | २४२ | — १३ |
| (६) | सोलापूर | १९१ | २१२ | + २१ |
| (७) | सातारा | २४९ | २२८ | — २१ |
| (८) | ठाणें | १७६ | १५१ | — २५ |
| (९) | मुंबई उपनगर | ४७ | ५ | — ४२ |
| (१०) | कुलाबा | ११४ | १७६ | + ६२ |
| (११) | रत्नागिरी | २५७ | १५५ | —१०२ |
| | | २१३५ | २१४१ | |

वरील आंकडे श्री. एन्. जी. आपटे यांच्या पुस्तकांत दिलेल्या आंकडयांवरून, परंतु त्यांत बदल करून तयार केलेले आहेत. गरज ठरवितांना श्री. आपटे यांनीं दररोज माणशीं दोन पौंड प्रमाण धरलें आहे. सध्यांच्या काळांत ज्या वेळीं दूध, भाजी—पाला वगैरे इतर अन्न-पदार्थ बहुसंख्य लोकांना जवळ जवळ दुर्मिळ झाले. आहेत त्या वेळीं धान्याचें रोजीं दोन पौंड हें प्रमाण बरोबर ठरेल. परंतु नेहमींच्या काळांत ती सरासरी जास्तच समजली पाहिजे. एकदल धान्य २० औंस व कडधान्य ३ औंस म्हणजे फार तर हें प्रमाण १॥ पौंड धरण्यास हरकत नाहीं; व त्याप्रमाणें आकारणी करून वरील गरजेचे आंकडे ठराविले आहेत. तसेंच श्री. आपटे यांच्या उत्पादनाच्या आंकडयांतहि बदल केला आहे. श्री. आपटे यांनीं ते आंकडे देतांना बी—बियाणें, नासधूस वगैरेंकरतां जी वजावाट करावयास पाहिजे ती केलेली नाहीं. साधारणतः या गोष्टीकरतां १२॥ टक्के घट आकारण्याचा प्रघात

आहे. तरी त्याप्रमाणें उत्पादनाचे आंकडे कमी करून वर दिले आहेत. वरील आंकडयांवरून असें दिसून येतें कीं, ११ जिल्ह्यांचा एकत्रित विचार करतां महाराष्ट्र अन्नधान्याच्या बाबतींत स्वयंपूर्ण आहे. सबंध देशाच्या मानानें ही स्थिति समाधानकारक असली तरी समाधानाचे हे सुस्कारे फार वेळ टिकत नाहींत. कारण दूध, भाजीपाला, फळफळावळ यांचा आपण विचार करूं लागलों कीं, सर्वत्र तुटीच्या रेघाच दिसावयास लागतात ! बिनतुटीचा असा एकहि जिल्हा नाहीं. या दोन्ही बाबतींतील आपटे यांचेच आंकडे खालीं दिले आहेत; परंतु याचा अर्थ त्याबाबतींत मतभेद नाहीं असा नव्हे. अन्न–धान्याच्या आंकड्याप्रमाणें गरज व पुरवठा या दोन्ही प्रकारच्या आंकड्यांत या बाबतींत फरक करावयाचा नसल्यामुळें गरजेच्या आकारणींसंबंधीं मतभेद खालीं नमूद करून आपटे यांचेच आंकडे कायम ठेविले आहेत. शिवाय कोणाचेंहि प्रमाण ग्राह्य धरलें तरी या बाबतींत एकहि जिल्हा तूटींतून वाढींत ( surplus ) जात नाहीं; व म्हणून आपटे यांचे आंकडे बदलण्याची आवश्यकता वाटली नाहीं.

## दूध

( आंकडे हजार टनांचे )

| जिल्हा | गरज | उत्पादन | –तूट |
|---|---|---|---|
| ( १ ) पश्चिम खानदेश | १५२ | ४३ | –१०९ |
| ( २ ) पूर्व खानदेश | २२१ | ६५ | –१५६ |
| ( ३ ) नाशिक | १८६ | ७६ | –११० |
| ( ४ ) अहमदनगर | १९० | ७५ | –११५ |
| ( ५ ) पुणें | २२७ | ७० | –१५७ |
| ( ६ ) सोलापूर | १६९ | ४३ | –१२६ |
| ( ७ ) सातारा | २२१ | ८२ | –१३९ |
| ( ८ ) ठाणें | १५६ | ५२ | –१०४ |
| ( ९ ) कुलाबा | ११२ | ३९ | – ७३ |
| ( १० ) रत्नागिरी | २२९ | ५८ | –१७१ |

( मुंबई उपनगराचे आंकडे मुंबई शहराच्या आंकड्याबरोबर एकत्रित असल्यामुळें ते या व खालील तक्त्यांत दिले नाहींत. )

वरील आंकड्यांत गरज माणशीं दररोज १६ औंस धरून ठरविलेली आहे. हें प्रमाण इष्ट असलें तरी विद्यमान परिस्थिति लक्षांत घेतां व्यवहार्यतेच्या दृष्टीनें ८ औंस प्रमाण धरणें कसें जरूर आहे तें वर दर्शविलेंच आहे. गरजेचा आंकडा निम्मा केला तरी प्रत्येक जिल्हा तुटीचाच राहतो.

## भाजीपाला व फळफळावळ.

( आंकडे हजार टनांचे )

| जिल्हा | गरज | उत्पादन | —तूट |
|---|---|---|---|
| ( १ ) पश्चिम खानदेश | ७६ | २१ | —५५ |
| ( २ ) पूर्व खानदेश | १११ | ४८ | —६३ |
| ( ३ ) नाशिक | ९३ | ५१ | —४२ |
| ( ४ ) अहमदनगर | ९५ | ३९ | —५६ |
| ( ५ ) पुणें | ११३ | १०८ | — ५ |
| ( ६ ) सोलापूर | ९३ | ३६ | —५७ |
| ( ७ ) सातारा | १११ | ३९ | —७२ |
| ( ८ ) ठाणें | ७८ | २१ | —५७ |
| ( ९ ) कुलाबा | ५६ | ६ | —५० |
| (१०) रत्नागिरी | ११४ | ३६ | —७८ |

वरील उत्पादनाचे आंकडे एकरांच्या आंकड्यावरून एकरी सरासरी ३ टन अशा अंदाजानें तयार केले आहेत असें दिसतें. वास्तविक आहार—चिकित्सेच्या दृष्टीनें भाजीपाला व फळफळावळ यांचे निरानिराळे आंकडे विचारांत घेणें इष्ट आहे. परंतु सरकारी अहवालांत या दोन्हींच्या क्षेत्राचे आंकडे एकत्रित दिले असल्यामुळें निरुपायास्तव त्यांचा एकत्रित विचार करणें भाग आहे. गरजेकरतां श्री. आपटे यांनीं माणशीं दररोज ८ औंस प्रमाण धरलें आहे; पण तें कमी आहे. आहारतज्ज्ञांच्या मतानें शाकाहारी माणसांनीं रोज निदान १० ते १२ औंस पालेभाज्या व फळभाज्या व २ औंस फळें खाल्लीं पाहिजेत. म्हणजे दोघांचे एकत्रित प्रमाण १२ ते १४ औंस होतें. यावरून गरजेचे वरील आंकडे

निदान १। पट करण्यास हरकत नाहीं असें दिसून येईल. अर्थात् त्यामुळें तूटच वाढणार आहे.

येणेंप्रमाणें महाराष्ट्राची परिस्थिति थोडी अधिक तपशीलवार पाहिल्यानंतर सबंध देशाच्या दृष्टीनें, आतांपर्यंतच्या विवेचनाचें सार म्हणून डॉ. अक्रॉइड यांचे तुटवडयाचे अंदाज देऊन हें प्रकरण आटोपतें घेतों. डॉक्टरमजकुरांच्या मतें हिंदुस्थान मध्यमप्रतीच्या चौरस व पुरेशा आहारापासून सुद्धां इतका लांब आहे कीं, ठोकळ मानानें एकदल धान्य ३०-टक्के, डाळींत १०० टक्के, दुधांत ३००–४०० टक्के, पालेभाज्यांत १०० टक्के वाढ झाल्याशिवाय हिंदुस्थानाच्या आहाराचें मान समाधानकारक मानतां येणार नाहीं.

यावरून युद्धपूर्व काळांतहि आपली अन्न–परिस्थिति किती हलाखीची होती, आपण उपासमारीच्या आसपास नेहमींच कसे वावरत होतों व त्यामुळें थोडासा धक्का बसतांच आपण भीषण दुष्काळाच्या खाईत कसे जाऊन पडलों याचा सहज उलगडा होईल.

## सरकारची जबाबदारी

बऱ्याच अंशीं या परिस्थितीबद्दल सरकारच जबाबदार आहे. सरकारच्या—विशेषत: परकी सरकारच्या—आवांक्याबाहेरील दुसरीं कांहीं कारणें नाहींत असें नाहीं. परंतु निसर्गावरसुद्धां मात करण्याचें पुढारलेल्या राष्ट्रांतील सरकारांचे अचाट प्रयत्न पाहिले म्हणजे हिंदुस्थान सरकारच्या अनास्थेची चांगली कल्पना येते. हॉलंडमध्यें सरकारनें तुफान दर्याला थोपवून धरणारे प्रचंड बांध बांधून, अशा रीतीनें बंदिस्त केलेल्या वाळवंटाचें नंदनवन बनविलें आहे. इटलीमध्यें सुमारें २० वर्षांच्या काळांत कोट्यवधि रुपये खर्च करून अंदाजे १। कोटी एकर दलदलीच्या जमिनींची सुधारणा करण्यांत आली. अमेरिकेंत रॉकी पर्वताच्या पश्चिम बाजूस पावसाचें वायां जाणारें पाणी, पर्वतांत आरपार तेरा मैलांपेक्षां जास्त लांबीचा बोगदा पाडून पूर्व बाजूच्या ओसाड भागांत आणून सोडलें; व अशा रीतीनें ७ लक्ष एकर नवीन जमीन बागायतीखालीं आणली. आणि तसें पहावयास गेलें तर या देशापेक्षां हिंदुस्थानांत शेतीचें महत्त्व फार आहे;

कारण येथें ७५ टक्के लोकांची उपजीविका शेतीवर अवलंबून आहे. हिंदुस्थान सरकार शेतीसुधारणेकरतां कांहींच करीत नाहीं असा याचा अर्थ नव्हे. परंतु त्यांचे प्रयत्न अत्यंत तोकडे आहेत. शिवाय खर्च होणारी सर्व रक्कमहि कारणीं लागत नाहीं; कारण सरकारच्या बऱ्याच सुधारणा हिंदुस्थानांतील शेतकऱ्यांचें दारिद्र्य, अज्ञान व त्यांची लहान तुकड्यांची शेती ही परिस्थिति विचारांत न घेतां पुरस्कारलेल्या असतात. या परिस्थितींतहि उपयुक्त असलेल्या सुधारणा पुष्कळ वेळां त्या शेतकऱ्यांपर्यंत जाऊनहि पोहोंचत नाहींत. याचें एकच उदाहरण द्यावयाचें म्हणजे एकंदर भातशेतीपैकीं फक्त ४ किंवा ५ टक्के जमिनींत सुधारलेलें बियाणें वापरलें जात आहे. एवंच हिंदुस्थानांतील इतर सर्व कारभाराप्रमाणें हिंदुस्थानांतील शेती मागासलेली आहे. ती किती मागासलेली आहे याची खरी कल्पना युरोप, अमेरिकेसारख्या पुढारलेल्या खंडांशीं तुलना करून येणार नाहीं; तर चीन, इजिप्त यांसारख्या मागासलेल्या देशांशीं तुलना करून येईल. हिंदुस्थानांतील भाताचें पीक एकरीं ८०० पौंड आहे तर चीनमध्यें तें १४०० पौंड व इजिप्तमध्यें २००० पौंड आहे. गहूं हिंदुस्थानांत ८११ पौंड तर चीनमध्यें ९८९ पौंड. दुधाचेंहि तसेंच. गुरांच्या संख्येंत हिंदुस्थानचा पहिला नंबर आहे. जगांतील सुमारें ७ कोटी जनावरांपैकीं २ कोटी १५ लक्ष एकट्या हिंदुस्थानांत आहेत. पण दुधाच्या वार्षिक पैदाशीच्या सरासरीचे आंकडे घेतले तर हिंदुस्थानचा नंबर शेवटचा आहे. हिंदुस्थानांत दूधदुभत्याच्या एका जनावरामागें वार्षिक पैदास ७५३ पौंड तर इजिप्तमध्यें २६६३ पौंड व डेन्मार्कमध्यें ७००५ पौंड आहे! आपल्या या देशांतील शेती कमालीची मागासलेली आहे, एवढेंच नव्हे तर तिच्याकडे अन्नपरिस्थितीच्या दृष्टीनें पाहण्याची कल्पना लढाईचा तडाखा बसेतोंपर्यंत सरकारच्या मनाला चाटूनहि गेली नव्हती. शेतीच्या उत्पादनांत कोणत्या प्रवृत्ति इष्ट आहेत, कोणत्या अनिष्ट आहेत, उत्तेजन कशाला द्यावयाचें अगर नियंत्रण कशाचें करावयाचें याचा मुळीं विचारच नाहीं; मग नियोजन तर नाहींच नाहीं. प्रा. राधाकमल मुकर्जी यांनीं १९१० ते १९४० या ३० वर्षांच्या

पैदाशीच्या आंकड्यांची छाननी करून असें दर्शविलें आहे कीं, या मुदतींत तांदुळाचें व गव्हाचें उत्पादन अनुक्रमें शेंकडा २ व ७ टक्क्यांनीं कमी झालें व ज्वारी व बार्ली यांचें अनुक्रमें ३९ व ५० टक्क्यांनीं वाढलें. यावरून ते असे निष्कर्ष काढतात कीं, हिंदुस्थानांतील शेतकऱ्यांची प्रवृत्ति या ३० वर्षांत कमी भांडवलाच्या म्हणजे अधिक गरिबीच्या शेतीकडे झुकली आहे व बहुजनसमाजाचा आहार तांदूळ व गहूं यांसारख्या सकस धान्यापासून ज्वारी–बार्ली यांसारख्या निकस धान्याकडे वळला आहे. प्रा. मुकर्जी यांचा पाहिला सिद्धांत मान्य करण्याजोगा आहे; परंतु दुसऱ्याबद्दल मात्र तसें म्हणणें कठीण आहे. त्यांनीं स्वतःच या धान्यासंबंधीं कॅलरी व प्रोटीनचे जे तुलनात्मक आंकडे दिले आहेत तेच त्यांच्या विरुद्ध आहेत. निदान ज्वारीच्या बाबतींत तरी असें म्हणतां येईल कीं, तिच्या पैदाशींत झालेली वाढ इष्टच आहे. सकसपणांत ती तांदुळापेक्षां कमी नसून उलट तिचा आणखी एक विशेष महत्त्वाचा फायदा आहे. हिंदुस्थानांतील आहारांत दुधाचें विशेष महत्त्व कसें आहे हें वर स्पष्ट केलेंच आहे. दुधाच्या पैदाशींत वाढ करण्याच्या प्रश्नाशीं चाऱ्याची वाढ करण्याच्या प्रश्नाचा निकट संबंध येतो. व त्या दृष्टीनें ज्वारीचें पीक फार महत्त्वाचें आहे. पण एवढें खास कीं, झालेली गोष्ट इष्ट असली तरी सरकारनें ती बुद्धिपुरःसर व व योजनापूर्वक घडवून आणलेली नाहीं. त्यांच्या सर्व कारभाराचें धोरणच मुळीं 'चाहे वह चले दो' ( laissez faire ) या स्वरूपाचें; मग त्यांत नियोजन कोठलें येणार ! आतां मात्र केवळ सरकारच तर्‍हे तर लोकमतहि खडबडून जागें झालें आहे. लढाई संपली तरी या प्रश्नाचा यानंतर अधिकाधिक खल झाल्याशिवाय राहणार नाहीं. वाईटांतून एवढें तरी चांगलें निघालें म्हणावयाचें !

## सध्यांची महागाई व टंचाई यांची कारणमीमांसा

याप्रमाणें प्रचलित दुष्काळाची पार्श्वभूमि म्हणजे नेहमींची अन्न-परिस्थिति पाहिल्यानंतर सध्यांची महागाई व टंचाई यांच्या कारणाकडे वळलें पाहिजे.

( १ ) पूर्वतयारी व कार्यक्षमता यांचा संपूर्ण अभावः—लढाई म्हटली म्हणजे लोकांचे थोडेबहुत हाल व्हावयाचेच. परंतु सरकारची

जबाबदारी एवढीच कीं, आपल्या कार्यक्षमतेच्या जोरावर त्यांची व्याप्ति व तीव्रता शक्य तेवढी कमी करावयाची. याच्या अगदीं उलट गोष्ट हिंदुस्थानांत घडली. इंग्लंडनें म्युनिच करारापर्यंत लढाई टाळण्याचा कसोशीनें प्रयत्न केला व त्यामुळें त्याची लढाईबाबत पूर्वतयारी होणें शक्य नव्हतें याची आम्हांस जाणीव आहे. तरीसुद्धां आपण एक दोन गोष्टी लक्षांत घेतल्या पाहिजेत. इंग्लंड हा कारखानदारीनें गजबजलेला देश; तो आपणाला लागणाऱ्या अन्नापैकीं फक्त ३० टक्के पिकवत होता इतकी शेती कमी. लढाईमुळें त्याची उपासमार वास्तविक तेव्हांच व्हावयाची. पण तसें मुळींच घडलें नाहीं. इंग्लंडनें लढाईच्या प्रारंभापासून अखेरपर्यंत आपली अन्न–परिस्थिति अत्यंत समाधानकारक राखली; एवढेंच नव्हे तर आपलें या बाबतींतील परावलंबित्व ७० टक्क्यांपासून उतरवत फक्त २५ टक्क्यांवर आणून ठेविलें. याशिवाय बंधमुक्त युरोपला पाठविण्याकरितां अन्नाचा प्रचंड सांठा करून ठेविला. कांहीं महिन्यांपूर्वीं त्यावेळचे उपपंतप्रधान मि. ॲटली यांनीं हा सांठा १० कोटी टन आहे असें जाहीर केलें आहे. यावरून हें निर्विवाद कीं, युद्ध अपरिहार्य आहे हें स्पष्ट कळल्यानंतर तयारी-साठीं मिळालेल्या अल्प मुदतीचा इंग्लंडनें भरपूर उपयोग करून उपास-मारीविरुद्ध जेवढा कडेकोट बंदोबस्त करतां येईल तेवढा केला. त्याबरोबर हेंहि तितकेंच उघड दिसतें कीं, हिंदुस्थानला आपल्याबरोबर युद्धांत खेचावयाचें हें प्रथमपासूनच ठरलेलें असलें पाहिजे. मग आपणांप्रमाणें हिंदुस्थानचीहि पूर्वतयारी इंग्लंडनें कां केली नाहीं? आधुनिक युद्धांत पेट्रोल म्हणजे अव्वल दर्जाच्या महत्त्वाची बाब. निदान त्याची तरी पूर्व तयारी हिंदुस्थानांत कां करण्यांत आली नाहीं? त्या परिस्थितीचा आढावा घेऊन जरूर ती तरतूद जर सरकारनें आगाऊ केली असती तर पुढें वहातुकीच्या साधनांची दैना उडून त्यामुळें जो हाहाःकार झाला त्याची तीव्रता तरी कमी झाली असती. इंग्लंडनें हिंदुस्थानला सर्वच बाबतींत इतकें परावलंबी करून ठेविलें होतें कीं, युद्धामुळें आमच्या इतर देशांशीं असलेल्या संबंधाला धक्का बसल्याबरोबर आम्हीं सर्वस्वीं असहाय बनलों. पण नुसत्या पूर्व-तयारीच्या अभावावरच भागलें नाहीं. परिस्थितीची गंभीरता स्पष्ट

झाल्यानंतरहि पुढें कार्यक्षमतेचा अभाव. हिंदुस्थान सरकारच्या युद्धकालीन अन्नकारभारावर नालायकीचा शिक्का अगदीं ठसठशीतपणें उमटलेला आहे. या नालायकींत प्रांतिक सरकारांचीहि भागीदारी आहे. विशेषतः बंगालच्या करुण कहाणीच्या जबाबदारींत बंगाल सरकारचा फार मोठा वांटा आहे. परंतु सिंध, पंजाबसारख्या वाढीच्या प्रांतांनीं दाखविलेली अश्लाघ्य, स्वार्थी, फुटीर वृत्ति व केलेली नफेबाजी कमी निषेधार्ह नाहींत. सिंधनें आपलें कर्ज एकदम कशाच्या जोरावर फेडलें ! बंगालची हृदयद्रावक कहाणी ऐकल्यानंतर पाकिस्तानी प्रांतांनीं आपल्या बंगाल्यांतील धर्मबांधवांकरितां किती स्वार्थत्याग केला, इत्यादि प्रश्न विचार करण्यासारखे आहेत. हिंदुस्थान सरकारच्या बाबत असें नमूद केलें पाहिजे कीं, तें अडचणीच्या परिस्थितींत सांपडलें होतें. प्रांतिक स्वायत्ततेच्या नव्या व नाजुक रोपट्याला हात लावणें व विशेषतः रंगरूटभरतीच्या प्रांतांना दुखाविणें त्यांना साहाजिकच जड गेलें. शेवटीं वेव्हेलसाहेब आले तेव्हांच खऱ्या खंबीर धोरणाला सुरवात झाली. परंतु त्यापूर्वी परिस्थिति किती तरी आवाक्याबाहेर गेली होती. नालायकीचा एक छोटासा नमुना पाहावयाचा असेल तर ता. ८।९।३९ ला किंमतनियंत्रणाचा जो पहिला हुकूम निघाला तो पहावा. त्यांत " किमान " का " कमाल " यांचाच गोंधळ केलेला व नियंत्रित धान्याचा समावेश न केलेला आढळेल ! अपुऱ्या, ढिल्या व दिरंगाईच्या उपायांचा सर्वत्र बुजबुजाट. परिस्थिति आपल्या अपेक्षेप्रमाणें नाहीं हें आढळून आल्यावर तरी सर्व गोष्टींचा आढावा घेऊन व्यापक योजना तयार करावयास पाहिजे होती; परंतु ठिगळें देण्याचें धोरणच किती तरी वेळ चालू होतें. लढाईच्या प्रारंभापासून तीन वर्षेंपावेतों 'Basic Plan' चा पत्ता नव्हता. आवश्यक वस्तूंपैकीं कांहींवरच नियंत्रण तर बाकीच्यावर नाहीं, एखाद्या वस्तूच्या किंमतीवर नियंत्रण तर सांठ्यावर नाहीं, सांठ्यावर आहे तर वाहतुकीवर नाहीं, कधीं नियंत्रण तर कधीं खुला व्यापार, एकदां फक्त १० टक्के धान्य घेऊन बाकीचें काळा बाजारांत जाण्याकरितां मोकळें सोडावयाचें, तर दुसरें वर्षी शेतकऱ्याचा बीबियाणा सुद्धां दाणान् दाणा टिपून न्यावयाचा; अशासारखे अर्धवट

व घरसोडीचे प्रकार अगदीं आतांपर्यंत आढळून येत होते. बेजबाबदार नोकरशाहीला लागलेला सर्वांत मोठा शाप म्हणजे अविश्वास. लोकांच्या मनांतील नोकरशाहीबद्दलचा हा अविश्वास किती तरी अनर्थांचें मूळ कारण. परंतु अजाणतां कां होईना तो अविश्वास वाढविण्याकडेच नोकरशाहीची वृत्ति आणि कृति. लोकांना विश्वासांत घेऊन लोकांचा विश्वास संपादन करण्याची प्रवृत्ति नाहीं; मग प्रयत्न कोठला ? या सर्व प्रकारांमुळें लोकांचे मात्र विनाकारण फार हाल झाले.

( २ ) वाहतुकीच्या साधनांची दाणादाणः हिंदुस्थानचा प्रदेश अफाट. अन्नधान्याच्या दृष्टीनें कांहीं प्रांत तुटीचे तर कांहीं वाढीचे व ते इतस्ततः दूरवर पसरलेले. यामुळें अन्नधान्याच्या सुस्थितींत वहातुकीच्या साधनांचें महत्त्व फार. लढाईमुळें या साधनांची दाणादाण झाल्याबरोबर साहाजिकच तुटीच्या भागांची दैना उडाली. लढाईंत सर्व गोष्टींवर पहिला हक्क लष्करी गरजेचा. ती सोय लागल्यानंतर मग उरलेल्या गोष्टी लोकांच्या वांटणीला. लष्करी माल आणि माणसें यांच्या वहातुकीचा मुख्य भर रेल्वेवर पडला; पण त्याला तोंड देण्याकरितां तिची साधनें वाढविण्याला तर वावच नाहीं; पण तीं उलट कमी करण्यांत आलीं. बाहेरचा माल येणें थांबलें. नवीन वाघिणी अगर एंजिनें बांधण्यास येथें सोय नाहीं. उलट येथील एंजिनें वाघिणी व रूळ सुद्धां इराक, इराण एजिप्तमध्यें पाठविले. १९३९ ते ४२ या तीन वर्षांत सुमारें १२५ एंजिनें व ६८०० वाघिणी कमी झाल्या. भयंकर ताण पडलेल्या या येथील इंजिनांची नुसती दुरुस्ती करण्याची सुद्धां सोय नीट राहिली नाहीं; कारण दुरुस्तीचे कारखानेहि दारूगोळ्यांकरितां दिले. रेल्वेला मोटारींनीं साथ दिली असती; पण त्यांची आयात थांबली व पेट्रोल कमी पडलें. गॅसवर मोटारी चालविण्याची कल्पना निघाली, पण पुढें कोळशाच्या टंचाईमुळें त्याला आळा बसला. मळीपासून पेट्रोल तयार करावें तर त्याची यंत्रसामुग्री बाहेरून आणतां येईना. बंगाल्यांतील खेड्यांचें दळणवळण बोटींवर फार अवलंबून आहे. परंतु लष्करी कारणाकरितां सरकारनें विशिष्ट भागांतील सुमारें ६६ हजार बोटींपैकीं फक्त २० हजार तेथें राहूं दिल्या. बाकीच्यांचा नाश करण्यांत आला

अगर त्या दुसरीकडे नेण्यांत आल्या. पूर्व किनाऱ्यावर शत्रु जवळ आल्यामुळें समुद्रावरील किनाऱ्यालगतचा व्यापार थांबला व त्याचा भारहि रेल्वेवरच पडला. अशा रीतीनें वहातुकीच्या साधनांची वाताहात झाल्यामुळें अन्नपरिस्थितीवर त्याचा भयंकर परिणाम झाला. तो इतका कीं, बंगालमधील दुष्काळाचें उग्र स्वरूप दिसून आल्यानंतर सुद्धां पंजाब सिंधमधून धान्य त्याला विशेषतः खेड्यांत, पटकन् पोहोंचवितां येईना. १९४३ ऑगस्टमध्यें पंजाबचे सर छोटुराम यांनीं असें जाहीर केलें कीं, बंगालला पाठविण्याकरतां हिंदुस्थान सरकारच्या वतीनें जवळ जवळ २। लाख टन गहूं पंजाबांत विकत घेऊन ठेवला असून त्यांतील फक्त ६४ हजार टन तें सरकार वाहून नेऊं शकलें. संयुक्त प्रांत सरकारनेंहि अशीच तक्रार केली.

( ३ ) मागणींत वाढ व पुरवठ्यांत तूटः वास्तविक लढाई सुरूं झाल्याबरोबर वस्तूंच्या मागणी–पुरवठ्यांत एकदम कांहीं फरक होत नाहीं. पण लढाई सुरूं झाल्याबरोबर सट्टेबाजीचें वारें सुटतें व त्याचा परिणाम एकदम किंमती वाढण्यांत होतो. या युद्धाच्या प्रारंभीं असेंच घडलें. सुरुवातीपासून ४ महिन्यांत अन्नधान्यांच्या किंमतीची सरासरी २७ टक्यांनीं वाढली. परंतु ही वाढ केवळ काल्पनिक कारणांनीं झाली असल्यामुळें पुढील ६।७ महिन्यांत ती २० टक्यांनीं खाली झाली व त्याच्या आसपास ती सुमारें १०।११ महिने राहिली. पुढें मात्र खऱ्या कारणांचा परिणाम किंमतीवर दृग्गोचर होऊं लागला. मूळचाच तुटीचा देश; त्यांत मागणी वाढली. शत्रूनें जिंकलेल्या ब्रह्मदेश वगैरे देशांतून सुमारें पांच लाख निर्वासित आले. बाहेरून आलेलें व देशांतील असें सैन्यहि वाढलें. उलट येथें उपलब्ध असलेला पुरवठाहि कमी झाला. ब्रह्मदेश गेल्यामुळें तांदुळाची फारच हाकाटी झाली. संपूर्ण योजना नसल्यामुळें धांदरटपणानें हिंदुस्थानावर त्याचा काय परिणाम होईल याचा विचार न करतां जशी लष्करी व राजकीय जरूरी पडली त्याप्रमाणें येथून इराण, लंका वगैरे ठिकाणीं धान्य रवाना करण्यांत आलें. सुरुवातीच्या सुरुवातीच्या निर्यातीकडे मनुष्य कानाडोळा करील. पण १९४२ च्या मे महिन्यानंतर ब्रह्मदेशचा तांदूळ हातचा गेलेला पाहून

व परिस्थिति आधींच बिकट झाली आहे, हें स्पष्ट नजरेसमोर असतांहि, १९४२–४३ सालांत २॥ लाख टन तांदुळाची व १ लाख टन गहूं वगैरे इतर धान्यांची निर्यात केली याला काय म्हणावें, हेंच कळत नाहीं. हिंदुस्थानांतील स्थानिक अगर बाहेरच्या सैन्याच्या वाढीनें हिंदुस्थानवर फारसा बोजा पडला नाहीं असें ग्रेगरी कमिटीचें म्हणणें आहे. कारण हिंदुस्थानांतील सैनिक सामान्य नागरिक म्हणून कांहीं तरी खात होताच. लष्करांत दाखल झाल्यामुळें त्याला थोडें जास्त रेशन मिळूं लागलें एवढाच बोजा वाढला. सर्व सैन्याकरितां जास्तींत जास्त ५ लाख टन गहूं व १॥ लाख टन तांदूळ एवढीच मागणी होती व हिंदुस्थानच्या एकंदर प्रचंड प्रमाणांच्या मानानें मागणी–पुरवठ्यांत तादृश फरक होण्याजोगी परिस्थिति नव्हती असें त्यांचें समर्थन आहे, तें सर्वस्वी बरोबर नाहीं. कारण, जादा मागणीचा बोजा सर्व उत्पादनावर पडत नसून बाजारांत येणाऱ्या धान्यावरच पडतो; व तसें पाहिलें म्हणजे जादा बोजाचें प्रमाण वाटतें तितकें कमी दिसणार नाहीं. एवढी गोष्ट सोडून तें समर्थन बऱ्याच अंशीं बरोबर आहे हें मान्य करावें लागतें. तरीसुद्धां या बाबतींत हिंदुस्थानाला थोडासा अन्याय झाला असें दिसतें. अमेरिकेचें सैन्य येथें आलें तर येथें आहे म्हणून त्याच्या अन्नपाण्याची जबाबदारी आमच्यावर; व आमचें सैन्य बाहेर गेलें तरी तेथेंहि त्याची जबाबदारी आमच्यावरच ! एकंदर मागणी–पुरवठ्यांत फारसा फरक झाला नसला तरी त्यांचे परिणाम मात्र प्रमाणाबाहेर झाले. वहातुकीचा बोजवारा उडाल्यामुळें कांहीं भागांत भयंकर टंचाई झाली. चिंतायुक्त अनिश्चिततेची छाया सर्वत्र पसरली. लष्करी निर्यातीसंबंधीं अफवांचें पेंव फुटलें. सरकारच्या कर्तबगारीबद्दल व सद्धेतूबद्दल सुद्धां विश्वास उडाला. सहाजिकच व्यापारी, शेतकरी व गिऱ्हाईक या सर्वांमध्यें संग्रहबुद्धि वाढीस लागली. बाजारांत माल कमी येऊं लागला. पण गिऱ्हाइकाची मागणी फार. दोन्ही बाजूंनीं असा ताण पडला. त्यांतच नफेबाजी व चलनवृद्धि यांची भर पडली व किंमती कडाडल्या. बहुजनसमाजाच्या ऐपतीबाहेर त्या गेल्यामुळें तो उपासमारीच्या दारांत जाऊन बसला.

( ४ ) नफेबाजी व लांचलुचपत : या सर्व करुण कहाणींतील हा अत्यंत काळाकुट्ट भाग होय. काळा बाजार, नफेबाजी व लांचलुचपत यांनीं सर्वत्र धुमाकुळ घातला. पण बंगालमधील त्यांचें अस्तित्व अधिकृत रीत्या शाबीत झालें आहे. वुडहेड कमिशन व रौलंडस् कमिटी ( बंगालच्या कारभाराची चौकशी करण्याकरितां नेमलेली कमिटी ) यांनीं आपल्या अहवालांत लांचलुचपतीचा रोग समाजांत, विशेषतः दुय्यम अधिकारीवर्गांत फार व्यापक प्रमाणांत फैलावलेला आहे असा स्पष्ट अभिप्राय नमूद केला आहे. लढाईच्या वातावरणांत झटपट श्रीमंत होण्याची वृत्ति फोफावते व तिला अनुकूल अशी परिस्थिति उत्पन्न होते. लढाईमुळें आवश्यक वस्तूंची दुर्मिळता, तिच्यांतून नफेबाजी व ती पचविण्याकरितां लांचलुचपत अशी संकटपरंपरा निर्माण होते. कांहीं प्रमाणांत हें अपरिहार्य असलें तरी त्याला सीमा आहे. युद्धाच्या प्रारंभीं प्रारंभीं व्यापारीवर्गांतील पुष्कळ लोकांनीं स्वस्त धान्याचीं दुकानें काढण्याच्या कामीं पुढाकार घेऊन उपयुक्त कामगिरी केली. परंतु पुढें मात्र त्यांच्यांतील फार मोठा वर्ग मोहाला बळी पडला. सरकारच्या शिथिल व हलगर्जीपणाच्या कारभाराला आम्ही जबाबदार धरतों, व तें रास्तच आहे. पण तें सरकार बोलूनचालून परकीय. येथील व्यापारी व अधिकारी हे आमच्याच हाडामांसाचे व रक्ताचे. नफेबाज व्यापारी व लांचलुचपतदार अधिकारी यांनीं माणुसकीला पारखे होऊन आपल्या दुष्कृत्यांनीं जनतेच्या यमयातना द्विगुणित केल्या. त्यांच्या अधःपाताचें अत्यंत किळसवाणें व चीड आणणारें स्वरूप बंगालमध्यें दिसून आलें. धर्मार्थ अन्नछत्रापर्यंतहि लांचलुचपतीच्या लीला जाऊन पोहोंचल्या. आपण गोळा करीत असलेली संपत्ति, भुकेनें तडफडून मरणाऱ्या आपल्या हजारों देशबांधवांच्या रक्तानें माखलेली आहे याची कदर त्यांनीं केली नाहीं.

( ५ ) चलनवृद्धि ( Inflation ) हें कारण सर्वांत शेवटीं दिलें असलें तरी तें सर्वांत कमी महत्त्वाचें नव्हे. तें अद्यापि चालूंच आहे व तें नाहींसें झाल्याशिवाय महागाई नाहींशी होणार नाहीं. केवळ समजण्यास कठीण, म्हणूनच तें शेवटीं दिलें आहे. आधुनिक लढाईंत थोडी-

बहुत चलनवृद्धि होणें अपरिहार्य आहे. देशांतील उत्पादनाचा ओघ लष्करी सामुग्रीकडे वळतो, व त्यामुळें नागरिकांच्या दैनंदिन उपयोगाकरतां लागणाऱ्या वस्तूंची पैदास कमी होते. बाहेरून येणारी आयातहि घटते व अशा रीतीनें या वस्तूंचा बाजारांत तुटवडा पडतो. याच्या उलट एकंदर उलाढाल व रोजगारधंदा वाढल्यामुळें चलन वाढून लोकांच्या हातांत जास्त पैसा खेळावयास लागतो. लोकांच्या हातांत खर्च करण्याची जी ही जादा शक्ति ( क्रयशक्ति ) येते ती स्वस्थ बसून राहणें शक्य नसतें. ती इकडे तिकडे खर्चाचीं ठिकाणें शोधत भटकावयाला लागतें व बाजारांत जो कांहीं थोडाबहुत माल येईल त्यावर झडप घालते. गिऱ्हाईकांत चढाओढ वाढल्यामुळें साहजिकच किंमती वाढतात. या चुरशींत गरीब कामगार वगैरे वर्ग टिकणें शक्य नसतें. वाढलेल्या किंमतीमुळें त्यांची मजुरी अपुरी पडावयास लागते. संप वगैरे करून त्यांना महागाईभत्ता वाढवून घ्यावा लागतो. तो जादा पैसा लोकांच्या हातांत खेळावयास लागला कीं त्यामुळें वर वर्णन केलेली " भटकी " क्रयशक्ति वाढून ती पुन्हां बाजार किंमतीवर परिणाम करते. अशा रीतीनें वाढत्या किंमती, वाढती मजुरी, पुनः वाढत्या किंमती असें दुष्ट चक्र सारखें वाढतच राहतें व त्यामुळें गरीब व मध्यम स्थितींतील लोकांचे फार हाल होतात. कारण बहुधा मजुरी अगर पगार यांची वाढ, किंमतीच्या वाढीला गांठूं शकत नाहीं. हिंदुस्थानांत लढाईच्या प्रारंभापासून राहणीचें मान २५० टक्केपर्यंत वाढलें; पण मजुरीचें मान फक्त १५० टक्के पर्यंत वाढलें. ज्या कुटुंबांतील जादा मंडळींना रोजगार मिळून त्यांची तूट भरून आली त्यांचें निभावलें; बाकीच्यांचें उत्पन्न कमी पडून त्यांचे हाल झाले. वर लिहिल्याप्रमाणें लढाईंत थोडीबहुत चलनवृद्धि अपरिहार्य असली तरी जेथें जबाबदार व कर्तबगार सरकार आहे तेथें तें रेशनिंग, करवाढ, सरकारी कर्जवाढ वगैरे उपायांनीं परिस्थिति आटोक्यांत ठेवतें. रेशनिंगमुळें चढाओढ बंद होऊन श्रीमंतांची फाजील क्रयशक्ति खर्ची करण्यांत येते व वस्तूंची समप्रमाणांत वांटणी होते. तसेंच वरील " भटकी " क्रयशक्ति निष्फळ होण्याकरतां सरकारी खजिन्यांत जाऊन

पडणें आवश्यक असतें. त्याकरितां सरकार करवाढ करतें व मोठमोठीं कर्जें उभारून लोकांचा पैसा ओढून घेतें. अशा प्रकारचे जरूर ते उपाय कार्यक्षम रीतीनें केले म्हणजे कशी समाधानकारक परिस्थिति राहते याचें इंग्लंड हें एक उत्कृष्ट उदाहरण आहे. इंग्लंडमधील राहणीच्या खर्चाचें मान ३३ टक्क्यांनीं वाढलें तर मजुरीचें प्रमाण ४५ टक्क्यांनीं वाढलें. लढाईच्या काळांत इंग्लंडमधील सामान्य जनतेचें आरोग्य सुधारलें असें म्हणतात तें उगीच नव्हे.

हिंदुस्थानांतील सध्यांच्या चलनवृद्धीच्या स्वरूपासंबंधीं आणखी थोडासा खुलासा केला पाहिजे. सध्याच्या चलनवृद्धींत फार मोठा भाग दोस्त राष्ट्रांना पुरविलेल्या मालाची किंमत देण्याकरितां काढलेल्या नोटांचा आहे. जें सुव्यवस्थित सरकार आहे तें, "कागद आहे, शाई आहे, छापखाना आहे, मग काय वाटेल तितक्या नोटा काढा" अशा रीतीनें नोटा काढीत नाहीं. काढलेल्या नोटांच्या किंमतीच्या आपल्या पतीप्रमाणें कमीजास्त, परंतु बऱ्याच मोठ्या प्रमाणांत सोनें, चांदी अगर त्यांचें नाणें असें भरीव तारण ठेवतें. जें सरकार दिवाळखोर बनतें तें मात्र छापखान्याचा भरमसाट उपयोग करून नोटा काढतें. ही सर्वांत वाईट प्रकारची चलनवृद्धि. हा प्रकार उघडकीस आला कीं, लोकांचा विश्वास झपाट्यानें उडून लवकरच कागदी चलनाला एका चिटोऱ्याची किंमत येते. ही परिस्थिति किती हास्यास्पद होऊं शकते याचें उत्तम उदाहरण म्हणजे पहिल्या महायुद्धानंतर जर्मनींतील चलनाची स्थिति. त्या नोटांची किंमत इतकी उतरली होती कीं, एखाद्या हॉटेलांत जेवावयास जावयाचें म्हणजे नोटांचें एक ओझें बरोबर न्यावें लागत होतें व पदार्थ मागविण्याचा गिऱ्हाईक विचार करतें आहे इतक्यांत किंमती वाढून आणखी नोटा देण्याची त्याला पाळी येत होती! हिंदुस्थानांतील चलनवृद्धि अशा प्रकारची बिनतारणाची नसली तरी ती चलनवृद्धि नव्हे असें नाहीं. त्याचा बाजारावर होणारा परिणाम थांबला नाहीं व त्यामुळें होणारे लोकांचे हाल टळले नाहींत.

लढाईपूर्वी १७० कोटी रुपयांच्या नोटा व्यवहारांत फिरत्या होत्या; आज त्या १,१३७ कोटी आहेत! कायद्याप्रमाणें नोटांच्या किंमतीच्या

निदान ४० टक्के तारण सोनें अगर इंग्लंडचें पौंडांतील कर्जरोखे असलें पाहिजे व त्यांपैकीं निदान ४० कोटी रुपयांचें सोनेंच असलें पाहिजे. पूर्वी आंतरराष्ट्रीय बाजारांत इंग्लंडची पत इतकी मोठी होती कीं इंग्लंडचें पौंडांचें चलन सोन्याइतकेंच शहाजोग, तरतें व सोयीचें तारण समजलें जात होतें, आणि त्यामुळें वरील व्यवस्था फारशी आक्षेपार्ह समजली गेली नव्हती. परंतु लढाईच्या अडचणीच्या काळांत मात्र इंग्लंडनें तिचा भरपूर फायदा घेतला. युद्धापूर्वी आपल्या १७० कोटी नोटांच्या तारणापैकीं ४४॥ कोटी रुपयांचें सोनें होतें व ५९॥ कोटींचे इंग्लंडचे कर्जरोखे होते. ( शिवाय ७५॥ कोटी रुपये व ३७। कोटी हिंदुस्थान सरकारचे कर्जरोखे ) आतां ११३७ कोटी नोटांच्या तारणापैकीं सोनें तेवढेंच आहे, पण इंग्लंडचे कर्जरोखे मात्र सुमारें १०२९ कोटींचे आहेत ! ही नोटांत व त्यांच्या तारणाच्या कर्जरोख्यांत भयंकर वाढ येणेंप्रमाणें झाली:—दोस्त राष्ट्रांना हिंदुस्थान सरकारनें खूप लष्करोपयोगी सामुग्री पुरविली व त्यांचेकरितां इतरहि खर्च केला. वास्तविक दोस्तांचें हिंदुस्थानांतील हें देणें भागविण्याकरितां जरूर लागणारें या देशांतील चलन मिळविण्याचें काम दोस्त राष्ट्रांचें होतें. पण आपलें सरकार ब्रिटिश सरकारचें अंकित असल्यामुळें त्यांनीं आपल्या प्रजेचें हित न पाहतां, इंग्लंडची सोय करणारी व्यवस्था अंमलांत आणली. हिंदुस्थान सरकारला जो खर्च करावा लागला त्याचे पैसे त्यांनीं हिंदुस्थानांत न घेतां लंडनमध्यें घेतले. ब्रिटिश सरकारनें आपल्या मर्जीस येईल तितक्या नोटा नव्हे, पण बिनतारणी असे आपले कर्जरोखे ( ट्रेझरी बिलें ) छापून ते हिंदुस्थान सरकारला देऊन त्यांच्या देण्याची भरपाई केली. हिंदुस्थान सरकारनें ते कर्जरोखे रिझर्व बँकेला दिले व त्या बँकेनें कायद्यांतील वर उल्लेख केलेल्या तरतुदीच्या आधारावर १८$\frac{3}{16}$ पेन्साला एक रुपया या ठराविक दरानें येथें नोटा काढल्या व त्या हिंदुस्थान सरकारला दिल्या. अशा रीतीनें व्यवहार जरी पुरा झाला असला तरी त्याचा खरा अर्थ काय झाला ? एवढाच कीं, येथील सरकारनें आपल्या कागदी चलनाची भयंकर वाढ करून ब्रिटिश सरकारला तितकी रक्कम कर्जाऊ दिली. अशा रीतीनें या

व्यवस्थेमुळें हिंदुस्थानला चलनवृद्धीचे हाल मोठ्या प्रमाणांत काढावे लागले व इंग्लंडांत मात्र त्यांना आळा बसला. बरें, तारणाच्या दृष्टीनें विचार केला तरी हिंदुस्थानला काय भरीव तारण मिळालें ? इंग्लंडचें चलन सोन्यावर आधारलेलें असतें तर पर्यायानें आमच्या नोटांनाहि सोन्याचें तारण आहे असें म्हणतां आलें असतें. पण तें तसें नसून तें इंग्लंडच्या पतीवर अवलंबून आहे. आज विजयामुळें ती पत थोडी सुधारली असली तरी तारण भरीव झालें आहे असें म्हणतां यावयाचें नाहीं. कारण इंग्लंडच्या पतीचा डोलारा यापुढील किती तरी अनिश्चित घडामोडींवर अवलंबून आहे. शिवाय वरील १०२९ कोटींचें स्टर्लिंग देणें केव्हां व किती द्यावयाचें हें इंग्लंडच्या मर्जीवरच आहे! आज इंग्लंड स्टर्लिंगबाहेरील व्यापाराकरितां त्याचा उपयोग करून देत नाहीं. सबब वर्ष तरी ती " गोठलेली " जिदगीच आहे. वास्तविक आपण महागाई-टंचाईचे हाल सोसून हिंदुस्थाननें इंग्लंडला माल पुरविला हे हिंदुस्थानचे उपकार तर आहेतच; पण शिवाय जीमध्यें इंग्लंडच्या पडत्या काळांत त्याच्या केवळ वचनाचें तारण शहाजोग म्हणून मान्य करावें लागत होतें अशी चलनवृद्धीची योजना पत्करून इंग्लंडवर आणखी उपकार केलेले आहेत. पण इंग्लंडमधील कांहीं जबाबदार मंडळींत सुद्धां हे उपकार कबूल करण्याचा संभावीतपणा नाहीं. हिंदुस्थाननें माल पुरविण्यांत भारी किंमती लावून नफेबाजी केली अशी मानभावीपणाची व मतलबी हाकाटी उठवून पार्लमेंटकडून एक चौकशी कमिटी नेमून घेण्यांत आली. या कमिटीनें वरील आरोप शाबीत धरला नाहीं हें योग्यच झालें. परंतु कमिटीनें साळसूदपणें असा अभिप्राय नमूद केला आहे कीं, हिंदुस्थाननें इंग्लंडकरतां केलेल्या खर्चामुळें त्या देशांत चलनवृद्धीला मोठी मदत झाली असें दिसत नाहीं! असो. तारण का विनतारण, हिंदुस्थानांत प्रचंड प्रमाणावर चलनवृद्धि झाली व ती कांहीं प्रमाणांत अद्यापि चालू आहे. मग महागाई नाहींशी कशी होणार ?

हिंदुस्थानांत चलनवृद्धीमुळें किंमती वाढल्या नसून वस्तूंच्या तुटवड्या-मुळें वाढल्या, असें हिंदुस्थानांतीलहि कांहीं लोकांचें म्हणणें आहे;

पण बहुतेक अर्थशास्त्रज्ञांना तें मान्य नाहीं. पुरवठ्यांत तूट हें एक महागाईचें कारण झालें; नाहीं असें नाहीं. परंतु वर दर्शविल्याप्रमाणें पुरवठ्यांत तूट, मागणींत वाढ, चलनवृद्धि, सरकारवरील अविश्वास, नफेबाजी इत्यादि कारणांचा एकत्रित परिणाम होऊन किंमती बेसुमार वाढल्या.

## सरकारी उपाययोजना व तिच्यांतील दोष.

सरकारी योजनेंतील एकंदर दोषांचें सारांशरूपानें वर्णन वर कारण नं. १ ची मीमांसा करतांना दिलेलेंच आहे. परंतु सरकारनें योजलेल्या कांहीं प्रमुख उपायांची छाननी अधिक तपशीलवार रीतीनें करणें आवश्यक आहे. तत्पूर्वी त्या उपायांची माहिती व इतिहास ठाऊक असणें हेंहि इष्ट आहे; परंतु सरकारी उपाययोजना व धोरण इतक्या नागमोडी वळणानें व इतक्या चुका करीत करीत बनत आलें आहे व सरकारी हुकमांचें इतकें दाट जंगल झालें आहे कीं त्यांचा संक्षिप्त इतिहास देण्यानें सुद्धां आधींच वाढलेल्या या छोटेखानी पुस्तकाच्या मर्यादेचें अतिक्रमण होणार आहे. सबब या बाबतींतील ठळक घडामोडींचा नुसता नामनिर्देश करून नंतर प्रमुख दोषांचा थोडक्यांत विचार केला आहे.

ता. २५–५–४० रोजीं सरकारनें धान्यनियंत्रणाबाबतचा पहिला हुकूम काढला. त्या हुकुमानें मध्यवर्ति सरकारनें प्रांतिक सरकारांना धान्यांच्या किंमतींचें नियंत्रण करण्याचा अधिकार दिला. त्यानंतरच्या आतांपर्यंतच्या काळांत सरकारनें अनेक भावनियंत्रण-परिषदा व अन्न-परिषदा भरविल्या व कित्येक नवीं खातीं निर्माण केलीं, शेंकडों नवनि अधिकारी व सल्लागार समित्या नेमल्या, अधिक धान्य पिक-विण्याची मोहिम सुरू केली, सरकारी दुकानें काढलीं, रेशनिंग सुरू केलें, अन्नधान्यसंपादनाच्या योजना अंमलांत आणल्या, खुला व्यापार करून पाहिला, सांठेबाजी, नफेबाजी, धान्यांची वहातुक, घाऊक व किरकोळ व्यापार, तांदूळ किती सडावयाचे इत्यादि बाबतींत अनेक नियंत्रणें जारी केलीं, रद्द केलीं, परत बसविलीं, वगैरे विविध प्रकारचे उपाय केले. शेवटीं १९४३ मध्यें आपले तुटपुंजे व तुटक उपाय निष्फळ झाल्याची जाणीव झाल्यामुळें, मुंबई, मद्रास, मलबार, त्रावणकोर वगैरे ठिकाणीं

आटोक्याबाहेर जाणारी परिस्थिति पाहून व विशेषतः बंगाल्यांतील भूकबळींच्या भेसूर चित्रांचीं वर्णनें वाचल्यामुळें देशांत व परदेशांत उठलेल्या प्रक्षोभानें गडबडून जाऊन सरकारनें सबंध देशाची अशी व्यापक योजना निश्चित करण्याकरितां प्रो. ग्रेगरी यांच्या अध्यक्षतेखालीं एक समिति जुलै महिन्यांत नेमली. त्यानंतर त्या समितीच्या मार्गदर्शनाप्रमाणें बऱ्याच पद्धतशीर रीतीनें अंमलबजावणी सुरू झाली. आक्टोबर १९४३ च्या अन्नपरिषदेंत अन्नमंत्री सर ज्वालाप्रसाद श्रीवास्तव यांनीं मध्यवर्ति सरकार जरूर पडल्यास प्रांतावरील नियंत्रणाची व देखरेखीची सर्व सत्ता बजावील असें खडखडीतपणें बजावलें; व विशेषतः त्यानंतर लवकरच वेव्हेलसारखे लष्करी तडफेचे व्हाइसरॉय येऊन त्यांनीं प्रथम बंगाल व नंतर इतर प्रांतांतील अन्नपरिस्थितीत जातीनें लक्ष घालून खंबीर धोरणास सुरुवात केली. त्यामुळें परिस्थिति आटोक्यांत येऊन तेव्हांपासून एकंदर बरीच सुधारणा झाली आहे. असें झालें असलें तरी एकंदर उपाययोजना अद्यापीहि पुष्कळ सदोष आहे.

भावनियंत्रण : रेशनिंग येईपर्यंत व त्यानंतर रेशनिंगबाहेरील वस्तूंचें भावनियंत्रण सर्वस्वीं निष्फळ ठरलें. किंमतीवर नियंत्रण आलें कीं, भूमींतून उत्पन्न झालेलें धान्य भुयारांत जाई. भावनियंत्रण म्हणजे खुला बाजार बंद व काळा बाजार सुरू असें समीकरण ठरूनच गेलें आहे. व्यापक असें नियंत्रण एकदम सुरू न करतां तुटक हप्त्यानें तें लागू करण्यांत आलें हा दोष तर होताच; पण भावनियंत्रणाच्या पहिल्याच प्रयोगाच्या वेळीं चुकीचें धोरण अवलंबून सरकारनें पुढील अपयशाचा पायाच घालून ठेविला. ता. ५–१२–४१ रोजीं सरकारनें गव्हाचा घाऊक भाव मणाला रु. ४–६–० ठरवून दिला व गव्हाची सर्वत्र हाकाटी झाली. तीन महिन्यांच्या आंत सरकारनें तो भाव मणाला १० आण्यांनीं वाढवून दिला. सुरुवातीसच योग्य भाव ठरवावयास पाहिजे होता. त्यावेळीं दाखविलेला फाजील कडकपणा अंगावर आला. अशा तऱ्हेनें या पहिल्या प्रयोगाच्या वेळींच लोकांच्यामध्यें सरकारच्या कार्यक्षमतेबद्दल अविश्वास, व्यापाऱ्यांमध्यें त्यांच्या भाव ठरविण्याच्या धोरणाबद्दल अविश्वास व जरा ताणून धरलें म्हणजे भाव वाढवून मिळतात या आशा निर्माण झाल्या व

त्यांचे दूरगामी परिणाम झाले. वाढत्या किंमतीचें आमिष डोळ्यांपुढें असणें हें माल बाजारांत येण्याच्या दृष्टीनें उघडच अनिष्ट असतें.

निरनिराळ्या तऱ्हेच्या नियंत्रणाच्या हुकुमांची इतकी बजबजपुरी झाली आहे कीं, खुद्द सरकारी अधिकाऱ्यांना सुद्धां कोणते हुकूम जारी आहेत व कोणते रद्द झाले आहेत याची दखल नसते. याबाबतचें एक मासलेवाईक उदाहरण नमूद करण्यासारखें आहे : सोलापूर जिल्ह्यांतील एका शेतकऱ्यावर साठ्यासंबंधीं हुकुमाचा भंग केल्याबद्दल खटला भरण्यांत आला व त्याला ६ महिन्यांची सजा झाली. १॥ महिना तुरुंगांत काढल्यानंतर त्याचें अपील सुनावणीस निघालें व त्यावेळीं असें दिसून आलें कीं, ज्या हुकुमाच्या भंगाबद्दल त्याला शिक्षा झाली, तो मुळीं रद्दच झाला होता ! अर्थात् तो निर्दोषी सुटला; परंतु १॥ महिना फुकट तुरुंगांत खडावें लागलें. इतके भाराभर हुकूम बाहेर निघत असतां व खेड्यांतील जनतेपर्यंत त्यांचा संबंध असतां त्यांना ते नीट कळतील अशीहि काळजी घेण्यांत येत नाहीं. परंतु त्यांच्यावर खटले मात्र भराभर भरले जातात. अपुऱ्या प्रसिद्धी-मुळें किंवा निर्हेतुकपणें घडलेल्या किरकोळ गुन्ह्यांकरतां भरलेल्या खटल्याबद्दल हायकोर्टानें व 'टाइम्स ऑफ इंडिया'सारख्या सरकार-अनुकूल वर्तमानपत्रांनीं सरकारवर अनेक वेळां कोरडे ओढले आहेत. पण अधिकाऱ्यांकडून एकंदर नियंत्रणांच्या केल्या जाणाऱ्या आक्षेपार्ह अंमलबजावणींत फारशी सुधारणा दिसत नाहीं. निर्बंधभंगाबद्दल दंड झालेल्या एखाद्या दुकानदाराचा लायसेन्स चालूं राहतो, तर अशा आरोपांतून कोर्टानें दोषमुक्त केलेल्याचा रद्द होतो अशा प्रकारचीं उदा-हरणें आढळतात. वर लिहिल्याप्रमाणें अज्ञानी शेतकऱ्यांवर खटले होतात, पण लांचलुचपतीनें संरक्षित अशी नफेबाजी करणारे निर्लज्ज-पणें आणि निर्धोकपणें आपले उद्योग चालवीतच असतात. सरकारनें आपल्याकडून नफेबाजी, लांचलुचपत वगैरे अनिष्ट प्रकार हुडकून काढ-ण्याची जादा तरतूद केली आहे. पण अधिकाऱ्यांनीं आपल्या वर्तनानें जनतेमध्यें एवढा अविश्वास उत्पन्न केला आहे कीं, वरील तरतूदींचा उपयोग करून घेण्यास कोणी धजावत नाहीं. पोलिस खात्याचे व

जनतेचे नेहमींचेच संबंध कसे आहेत तें प्रसिद्धच आहे. त्यांत ऑगस्ट चळवळीविरुद्ध केलेल्या दडपशाहीच्या काळांत खालील अधिकाऱ्यांना जी स्वैर सत्ता मिळाली तिच्या परिणामांची भर पडल्यानंतर पोलिसच्या वाऱ्यालाहि कोणी उभें राहीनासें झालें तर आश्चर्य काय ? आपल्या तक्रारीमुळें आपणच पेंचप्रसंगांत येणार नाहीं अशी खात्री असल्या-शिवाय कोण या भानगडींत पडणार ? आणि वर लोकपक्षीय सरकार असल्यांशिवाय जनतेमध्यें तसा विश्वास कसा निर्माण होणार ?

**हैदरी कमिशन :** महागाई कमी करावयाची तर, चलनवृद्धीला आळा बसला पाहिजे. हिंदुस्थान सरकारनें युद्धप्रयत्नांत आपणाला इतकें गुरफटून घेतलें कीं, हिंदुस्थानवर त्याचा काय परिणाम होतो याबद्दल तें सर्वस्वीं बेफिकिर राहिलें. बंगालच्या भयानक दृश्यानें मात्र त्यांचे डोळे उघडले. युद्धाची आघाडी जिंकावयाची तर घरची आघाडी सांभाळली पाहिजे, सोन्याचीं अंडीं घालणारी हंसी निदान जिवंत ठेविली पाहिजे,याची त्यांना जाणीव झाली; व या जाणिवेंतूनच वेव्हेलांचे प्रयत्न, हैदरी मिशन यांसारख्या गोष्टी जन्माला आल्या. हैदरी मिशनच्या कार्यामुळें लष्करो-पयोगी माल पुरविण्याची जबाबदारी कमी होईल, लोकोपयोगी मालाची आयात वाढेल व त्या मानानें चलनवृद्धीला व तिच्या परिणामांना आळा बसून आपणांवरील ताण जरा सैल होईल. बाहेरील आयातीमुळें येथील उद्योगधंद्यांना धक्का पोहोंचूं नये अशी लोकांना सहाजिकच काळजी; पण जाहीर झालेल्या माहितीवरून व आजची विशिष्ट परिस्थिति लक्षांत घेतां तशी काळजी करण्याचें तूर्त तरी कारण दिसत नाहीं. भीति आहे ती एवढीच कीं, हैदरी योजनेप्रमाणें प्रत्यक्ष माल पदरांत पडतो कीं नाहीं.

**अधिक धान्य पिकवा :** अधिक धान्य पिकविण्याच्या मोहिमेंत प्रत्यक्ष फलनिष्पत्तीपेक्षां गाजावाजा व आकड्यांचें गौडबंगालच जास्त दिसतें.सरकार जाणूनबुजून हातचलाखी करतें आहे किंवा काय असा संशय येतो.पैदाशीची किंवा क्षेत्राची किती वाढ झाली हें दाखविण्याकरितां सरकार लढाईच्या पूर्वीच्या आंकड्यांशीं तुलना करतें. वास्तविक अधिक धान्य पिकविण्याच्या मोहिमेला जपान युद्धांत पडल्यानंतर सुरुवात झाली, सबब त्या वेळच्या

आंकड्यांशीं तुलना केली पाहिजे. सरकारनें दिल्लीच्या असेंब्लींत असें जाहीर केलें कीं, सरकारनें आपल्या प्रयत्नांनीं ब्रह्मदेशाच्या तांदुळाची तूट ( २० लाख टन ) भरून काढली इतकेंच नव्हे तर आणखी २० लाख टन उत्पादन वाढविलें; म्हणजे पूर्वीच्या २ कोटी ६० लक्ष टनाचे जागीं हल्लीं पैदास ३ कोटी झाली. सभासदांनीं साहजिकच विचारलें कीं, " अहो, मग लोकांना पूर्वीइतका तांदूळ खावयास कां देत नाहीं ?" श्री. अब्दूल कयूम यांनीं दाखवून दिलें कीं, १९३०–३१ सालींहि ३ कोटी उत्पादन होतें. सरकारच्या या आंकडेबाज़ीवरून एका चुटक्याच्या खरेपणाचा अनुभव येतो. असें म्हणतात कीं, एखादा दारुडा दिव्याच्या खांबाचा जसा उपयोग करतो तसाच राजकारणी आंकड्यांचा करतो. म्हणजे झिंगून रस्त्यांतून जातांना दारुडा दिव्याच्या खांबापाशीं थबकतो तो उजेडाकरितां नव्हे; तर आपला जाणारा तोल संभाळण्याकरितां. त्याप्रमाणें मुत्सद्दी आपल्यापुढें असलेल्या प्रश्नावर प्रकाश पाडण्याकरितां आंकड्यांचा उपयोग करीत नसून आपली लंगडी बाजू सांवरून धरण्याकरितां करतो ! असो. तांदुळाशिवाय इतर अन्नधान्यांत १५ लाख टनांची वाढ होऊन एकंदर अन्नधान्याचें उत्पादन ६ कोटी १० लक्ष टन झालें असें सरकारचें म्हणणें. परंतु यांतून नासधुशीचे शेकडा ५ टक्के कमी केले म्हणजे अंदाजें ५ कोटी ८० लाख टन राहतात. हे उत्पादनाचे आंकडे खरे असले तरी तें उत्पादन टिकलें पाहिजे. तांदुळाचा अगदीं ताजा सरकारी अंदाज ३० लक्षांनीं कमी म्हणजे २ कोटी ७० लाखांचा आहे. मुंबई प्रांतांत सक्तीच्या कायद्यामुळें अन्नधान्याखालील जमिनीचें क्षेत्र १२॥ लाख एकरांनीं वाढलें असें सांगण्यांत येतें; परंतु खरीप पीक नेहमींपेक्षां कमी भरलें असावें असाच सरकारी अंदाज. सरकार आधीं गहाळ राहिलें व आतां मात्र धांदरटपणानें असें वागत आहे कीं त्यामुळें एकंदरींत पैदास कमीच व्हावयास लागेल. या प्रांतांत धान्यसंपादनाची योजना एकदम इतक्या जोरानें सुरू करण्यांत आली कीं, बऱ्याच ठिकाणीं बियाणाकरितां शेतकऱ्यानें निवडून ठेवलेलें धान्यहि त्याच्याकडून काढून घेण्यांत येऊन तें सामान्य गठ्ठयांत सामील करण्यांत

आलें. आतां मागाहून त्याला कमी प्रतीचें बियाणें देण्यांत येत आहे व तेंहि वेळेवर मिळत नाहीं. याचा परिणाम उत्पादनावर झाल्याशिवाय राहणार नाहीं. पुष्कळ ठिकाणी बीवड म्हणून भुईमूग, तंबाखू वगैरे पिकें व अन्नधान्य आलटून पालटून करावीं लागतात. परंतु हें लक्षांत न घेतां अन्नधान्य लागोपाठ पेरण्याची सक्ति केल्यामुळेंहि उत्पादनावर परिणाम होणार आहे. शिवाय सरकारनें हें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, असंतुष्ट व उद्विग्न अशा शेतकऱ्यावर नुसता सक्तीचा दंडुका उगारून पैदाशींत फारशी सुधारणा दिसणार नाहीं. भरपूर सवलती व भरीव मदत यांनींच त्याला खरें उत्तेजन मिळेल. एकरी १०००–१२०० रुपये उत्पन्न होणाऱ्या पिकां-ऐवजीं शेतकऱ्याला एकरी २००–३०० रुपये मिळणारें पीक पेरावयाची सक्ति करावयाची व अशा रीतीनें होणाऱ्या नुकसानीबद्दल त्याला भरपाई काय द्यावयाची तर म्हणे साऱ्यांत अगर पाणीपट्टींत सूट म्हणजे ५–५० रुपयांची सवलत. नाहींतर इंग्लंडचें उदाहरण पहा. तेथें शेतकऱ्याचें नुकसान होऊं नये पण गिऱ्हाइकाला तर आवश्यकक वस्तू स्वस्त मिळा-व्यात म्हणून तेथील सरकार सढळ हातानें देणग्या (subsidies) देऊन तोटा आपण सोसतें. अशा देणग्याकरिता तेथें सरकार दरसाल २८० कोटी रुपयेपर्यंत खर्च करीत आलें आहे. गरजेच्या दृष्टीनें माणशी रोजीं १ पौंडाप्रमाणें हिशोब केल्यास रत्नागिरी व उपनगर जिल्हे खेरीज करून महाराष्ट्रांत तें प्रमाण पदरांत पडण्यास वास्तविक कोठेंच अडचण पडूं नये पण सर्व कारभार व्यवस्थेंत राहील तरच तें होईल. सबंध देशाच्या दृष्टीनें लष्करी मागणी वगैरे बाबी विचारांत घेऊन अंदाजी गरज जवळ जवळ ६ कोटी टनापर्यंत जाईल. वर दर्शविल्याप्रमाणें उत्पादनाचा आंकडा ५ कोटी ८० लाखांपर्यंत पोहोंचतो. उत्पादनांत पटकन् वाढ करणारा असा उपाय म्हणजे रासायनिक खताचा उपयोग करणें. पण ते आज दुर्मिळ. हिंदुस्थान सरकार आतां देशांत अशा खतांचा कारखाना काढण्याच्या उद्योगाला लागलें आहे. परंतु तहान लागल्यावर विहीर खणावयास लागण्यासारखेंच तें आहे. अशा स्थितींत तूर्त तरी आपली तूट भरून काढण्यास आयातीवरच अवलंबून राहणें भाग आहे. पण त्यांतहि आपण ब्रिटिश सरकारच्या मर्जीवर अवलंबून.

ग्रेगरी कमिटीनें शिफारस केलेली १५ लाखांची आयात ११ लाखांवरच भागविण्यांत आली व तीहि ठरलेल्या वेळापेक्षां ३ महिने जास्त घेऊन. बंधमुक्त युरोपकरितां ९० कोटी टन धान्य पुरविणाऱ्या इंग्लंडला फक्त १५ लाख हिंदुस्थानांत पाठवितां येऊं नये इतकी जहाजांची अडचण आहे काय ? आतां दरमहा १ लाख टन प्रमाणें ६ लाख टन गहूं आणण्यांत येणार आहे यावरच समाधान मानून व पुढील वर्षी रंगूनचा तांदूळ येईल या आशेकडे डोळे लावून बसलें पाहिजे.

**धान्यसंपादन :** देशांतील उत्पादनांतून योग्य प्रमाणांत धान्य बाजारांत आलें पाहिजे हेंहि आवश्यक. त्या दृष्टीनें धान्यसंपादनाच्या निरनिराळ्या योजना प्रांतांनीं अवलंबिल्या आहेत. येथें फक्त मुंबई प्रांतांतील योजनेचाच विचार करूं. तुटीच्या प्रांताला योग्य अशा सक्तीच्या धान्यखरेदीच्या पद्धतीकडे आपलें सरकार आतां वळलें आहे. पण उशिरां व अर्धवट योजनांचा प्रयोग करून पाहिल्यानंतर. त्याचा परिणाम असा झाला कीं, दरम्यान काळा बाजार चांगलाच पोसला गेला व त्याला आळा घालणें कठीण झालें. सध्यांची योजना ' लेव्ही योजना ' म्हणून प्रसिद्ध आहे. भातभागाला यंदा ही सक्तीची लेव्हीची पद्धत लागू केली नव्हती; पण हें केवळ कागदावरच, कारण कुलाबा व कदाचित् ठाणें खेरीजकरून इतर भातभागांत लेव्हीपेक्षांहि जास्त कडक वसुली त्याविरुद्ध जोरानें ओरड होईतों-पर्यंत झाली. लेव्ही योजनेंतील मुख्य दोष म्हणजे ठिकठिकाणच्या जमिनीच्या मगदुराप्रमाणें पैदाशीचे अंदाज बांधून त्याच्या आधारावर लेव्ही मागणीचीं जीं कोष्टकें तयार केलीं होतीं त्यांत कांहीं तरी चूक असावी. साधारणतः पांच माणसांच्या कुटुंबाला वर्षाला खाणें, बियाणें इत्यादींकरतां म्हणून २७॥ मण एकदल धान्य लागतें असा सरकारनें अंदाज केला; व कमींत कमी तेवढें धान्य ठेवून वर जें शिल्लक राहील त्यांतील भाग, जसजसें क्षेत्र वाढेल तसतसें वाढत्या दरानें घ्यावयाचा अशी सरकारी योजना व त्याप्रमाणें कोष्टकें तयार केलीं. पण फार ठिकाणीं प्रत्यक्ष अनुभव असा आला कीं त्या कोष्टकाप्रमाणें येणारी मागणी वस्तुस्थितीला अगदीं सोडून होती. म्हणजे ती मागणी पुरी

केल्यावर २७॥ मग शिल्लक राहत नव्हतें इतकेंच नव्हे, तर कित्येक ठिकाणीं ती लेव्ही पुरी करण्याइतकेंहि पीक झालें नव्हतें. अर्थात् शेतकऱ्यांतर्फे बरीच चळवळ झाली, वरिष्ठ अधिकाऱ्यापर्यंत तक्रारी नेण्यांत आल्या, वर्तमानपत्रांत पत्रापत्रीहि झाली. सरकारनें प्रत्यक्षरीत्या कोष्टकांत चूक आहे हें कबूल केलें नाहीं; परंतु नंतर अधिक चौकशी करून प्रांतांतील जवळ जवळ सर्व भागांत लेव्ही मागणींत २५ ते १०० टक्के सूट दिली. या अनुभवामुळें पुढील वर्षी सरकार कोष्टकांतच कांहीं फरक करतें किंवा काय तें पहावें. पण कांहीं झालें तरी आपणच कमीत कमी म्हणून ठरविलेलें २७॥ मण धान्य शेतकऱ्याजवळ राहतें अशी खबरदारी सरकारनें घेतलीच पाहिजे. सरकारचे एक तज्ञ सल्लागार मि. सॉमरसेट बटलर यांनीं असें म्हटलें आहे कीं ज्या वेळीं सरकार सर्व धान्यव्यवस्था आपल्याकडे घेतें त्या वेळीं शेतकरी व त्याच्या कुटुंबांतील माणसें यांचे हितसंबंध सुरक्षित ठेविले आहेत अशी त्याची खात्री पटविली पाहिजे. लेव्ही योजनेंतील दुसरा मोठा दोष म्हणजे पांचापेक्षां जास्त माणसें कुटुंबांत असल्यास त्या प्रमाणांत जास्त धान्य ठेवण्याची परवानगी नाहीं. अशा कारणानें ज्यांचें धान्य लवकर संपेल त्यांना नंतर रेशनचे दाखले मिळवून त्या आधारें सरकारी दुकानांतून धान्य विकत घेतां येईल असें सरकारचें म्हणणें; पण ही व्यवस्था शेतकऱ्याच्या दृष्टीनें अन्यायाची आहे. यांत आधीं घेण्याचा, नंतर देण्याचा व दरम्यानच्या काळांत सांठविण्याचा खटाटोप व खर्च विनाकारण वाढतो व खर्च घेणाऱ्या शेतकऱ्यावर पडतो. शिवाय, धान्य संपलें तरी रेशनदाखले लवकर मिळत नाहींत; व धान्य ठेवण्याची सरकारी व्यवस्था चांगली नसल्यामुळें शेतकऱ्याच्या पदरांत पडेतोंपर्यंत बरेच वेळां धान्य खराब झालेलें असतें. कांहीं ठिकाणीं सरकारी कोठारांतून सडका माल काढून टाकण्यापर्यंत पाळी आलेली आहे. सरकार आपल्या योजनेचें असें समर्थन करतें कीं, खालच्या अधिकाऱ्यांच्या लांचलुचपत व वशिलेबाजीला वाव राहूं नये म्हणून ठरीव कोष्टकाची पद्धत सुरू केली. जर कुटुंबांतील माणसांच्या संख्येप्रमाणें लेव्ही मागणी

कमीजास्त करावयाची तर ही ठरीव पद्धत नाहींशी होते व लांचलुचपत, वशिलेबाजी यांना वाव मिळतो. यावर उत्तर असें कीं, लांचलुचपत करावयाचीच असेल तर पुढें रेशनदाखलें देण्याच्या वेळीं तरी तिला वाव मिळणारच; तो टळूं शकणार नाहीं. शिवाय आतां घासलेट व साखर याकरितां कुटुंबांतील माणसांची मोजदाद झालेलीच आहे. सबब ठरीव कोष्टकांची पद्धत व माणसांच्या संख्येप्रमाणें मागणी कमीजास्त करणें या दोहोंची सांगड घालतां येईल. क्षेत्राप्रमाणें प्रथम कोष्टकावरून मागणी काढावी. ( अर्थात् कोष्टकें मात्र सुधारलीं पाहिजेत. ) व नंतर कुटुंबांतील माणसें ५ पेक्षां कमीजास्त असतील तेवढ्यापुरता त्या आंकड्यांत बदल करून त्याप्रमाणें मागणी करावी. शेतकऱ्याची स्वतःची गरज भागून त्याजजवळ जे खरें 'surplus' उरेल तें सर्व घेण्याची मद्रास प्रांतांतील मलबार जिल्ह्यांत पद्धत आहे. वास्तविक अशी योजनाच इष्ट आहे. कारण तीमुळें काळ्या बाजाराच्या पुरवठ्याचे झरे बुजविले जातात. लेव्ही मागणींत सूट देण्यांत व योजनेंतलि दुय्यम दर्जाची गाऱ्हाणीं दूर करण्यांत वरिष्ठ अधिकाऱ्यांचें धोरण एकंदरींत समंजसपणाचें व सहानुभूतीचें राहिलें हें नमूद केलें पाहिजे. परंतु या सर्व गोष्टी त्यांनीं उशिरां केल्या व त्यामुळें त्यांचें सर्व फळ शेतकऱ्यांच्या पदरांत पडलें नाहीं. शिवाय वरील धोरण सहानुभूतीचें असलें तरी प्रत्यक्ष अंमलबजावणींत मामलेदारापासून खालील अधिकाऱ्यांचें वर्तन बरेंच आक्षेपार्ह आढळलें. भातभागांतील वसुलीचा वर उल्लेख केलाच आहे. पण इतरत्रहि कित्येक ठिकाणीं शेतकऱ्यांच्या घरांत त्यांच्या गैरहजेरींतहि शिरून बी–बियाणासुद्धां सर्व माल नेणें, बेकायदेशीर जप्त्या करणें वगैरे प्रकार झाले. लांचलुचपत-मागणीच्या तक्रारीहि बऱ्याच ऐकूं येत होत्या. सरकारनें आपल्या खालच्या अधिकाऱ्यांच्या वर्तनावर करडी नजर ठेवावयास पाहिजे होती. तुरुंगांतून नुकत्याच सुटून आलेल्या कॉंग्रेस कार्यकर्त्यांनीं सर्वसामान्य लेव्ही योजनेबाबत पुष्कळच उपयुक्त कार्य केलें; पण ठिकाठिकाणच्या व्यक्तिविषयक अन्यायांना आळा घालण्याच्या कामीं किंवा व्यक्तिगत गाऱ्हाण्यांची दाद लावण्याच्या कामीं आपली संघटना अपुरी पडली.

नाहीं तरी त्या वेळच्या सर्वस्वीं प्रतिकूल कालांत हें काम कठीणच होतें यांत शंका नाहीं.

आता शेवटीं धान्यवांटपाबद्दल. रेशनिंगचा प्रारंभ व प्रसार करण्यांत आपल्या प्रांतानें आघाडी मारलेली आहे. आज प्रांतांत १०० शहरांत रेशनिंग आहे व बाकी राहिलेल्या ग्रामीण भागाकरितां ४००० दुकानें आहेत. रेशनिंगबद्दलच्या बऱ्याच तक्रारी वर जागजागीं नमूद झाल्याच आहेत. त्यांचा पुनरुच्चार करण्याचें कारण नाहीं. रोज १ पौंड एक-दल धान्य हें रेशन अपुरें आहे. त्यानें फक्त १६०० कॅलरी भरतात. बाकी राहिलेल्या १२०० कॅलरींची भरती करण्यास दूध, भाजीपाला वगैरे इतर मार्ग सध्यां बहुजनसमाजाला जवळ जवळ बंदच झाले आहेत. शारीरिक कष्ट करणाऱ्या मजूर व शेतकऱ्यांना तर हें रेशन विशेषच अपुरें आहे. निदान त्यांच्यापुरतें तरी जादा रेशन ( मुंबई-प्रमाणें ) मिळालें पाहिजे. तांदुळाचें रेशन पांढरपेशांना फार कमी पडतें, आणि ज्वारी—बाजरीचें खालच्या वर्गांना कमी पडतें. तांदूळ, गहूं यांसारखीं महाग धान्यें त्यांना परवडत नाहींत व ज्वारीबाजरी पुरीशी दिली जात नाहींत; अशा रीतीनें त्यांची उपासमार होते. त्यापेक्षां म्हैसूरमध्यें रेशनचे दोन प्रकार केले आहेत ते अधिक सोईस्कर. तेथील योजनेप्रमाणें ज्यांना तांदूळ जास्त पाहिजे त्यांना एकंदर धान्य कमी मिळतें व ज्यांना तांदूळ कमी चालतो त्यांना बाकीचें धान्य जास्त प्रमाणांत मिळतें. यामुळें दोन्ही वर्गांची सोय होते. सबंध रेशन ज्वारी—बाजरींत घेण्याची परवानगी देऊन निदान गरीब लोकांची सोय केली पाहिजे. इतर दृष्टीनें आपला प्रांत पुढारलेला असला तरी किरकोळ विक्रीच्या सहकारी दुकानांच्या बाबतींत मद्रासचा पाहिला नंबर आहे. नफेबाजी व लांचलुचपत यांना आळा घालण्याच्या दृष्टीनें सहकारी दुकानांना उत्तेजन ( अर्थात् विवेचकपणें ) द्यावयास पाहिजे होतें. परंतु याच कारणाकरतां किंवा काय न कळे पण अधिकाऱ्यांचा त्यांच्याबद्दल दुजा भाव दिसतो. त्यांना माल नीट मिळत नाहीं वगैरे फार तक्रारी ऐकूं येतात. मद्रासचा पाहिला नंबर असला तरी जवळजवळ तेवढ्याच

लोकसंख्येच्या इंग्लंडशीं तुलना केली म्हणजे आपण किती मागासलेले आहों याची कल्पना येते.

तुलनात्मक आंकडे खालीं दिले आहेत.

| | लोकसंख्या | सोसायट्या | सभासद | वार्षिक उलाढाल |
|---|---|---|---|---|
| मुंबई | २,०८,५८,०००. | १०६ | २८,८५८. | १,४०,७७४ रु. |
| मद्रास | ४,९३,४२०००. | ११९१ | ३,४३,०००. | ८,३२,३६००० रु. |
| इंग्लंड | ४,८०,००,०००. | १०५८ | ९०,००,००० | ३२ कोटी पौंड |

( वरील आंकड्यांपैकीं फक्त मद्रासचे १९४३–४४ आहेत. बाकीचे १९४२–४३ चे आहेत. )

खेडेगांवांतील धान्य खरेदीच्या व विक्रीच्या सरकारी दरांत ५ टक्क्यांपेक्षां जास्त फरक असणार नाहीं असें जाहीर झालें; परंतु प्रत्यक्ष अनुभवांत विक्रीचा दर ५० टक्के जास्त आढळतो. यामुळें लोकांना सरकार नफेबाजी करतें असा संशय येतो. विक्रीचे दर ताबडतोब कमी होणें सर्व दृष्टींनीं जरूर आहे.

रेशनिंगमुळें शहरांतील धान्यवांटपाची परिस्थिति सुधारलेली आहे. परंतु खेडेगांवांतील लोकांवर मात्र त्या बाबतींत अन्याय होण्याचा नवा धोका डोकावूं पाहात आहे; व तो म्हणजे वर उल्लेख केलेले शेतकऱ्याजवळ त्याच्या गरजेपुरतें धान्य न ठेवितां सर्वच्या सर्व उत्पादन, संपादन करण्याचें धोरण या धोरणामुळें कित्येक ठिकाणीं लोकांचा पोशिंदा असा शेतकरी स्वत: अन्नाला मोताद झाला आहे व त्यामुळें त्याच्यांत असंतोष व सरकारबद्दल अविश्वास वाढत आहे. हिंदुस्थानांतील शेतकरी वर्ग हा " कन्झ्यूमर " वर्गाचा फार मोठा भाग आहे हें सरकारनें लक्षांत ठेविलें पाहिजे. या दृष्टीनें धान्यवांटपाच्या ज्या योजनेंत बहुसंख्य लोकांवर अन्याय होतो ती इतरत्र कितीहि कार्यक्षम असली तरी ती अयशस्वी व म्हणून त्याज्यच समजली पाहिजे.

## उपसंहार.

अन्नधान्य परिस्थितीचें आतांपर्यंत जें समालोचन केलें आहे त्यावरून एक गोष्ट वाचकांच्या ध्यानांत आली असेल कीं, सध्यांच्या बिकट परि-

स्थितीचें एक प्रमुख व प्रबल कारण सरकारवरील अविश्वास हें आहे. आणि यामुळेंच आपल्या जिल्ह्याच्या, मध्यवर्ति व प्रांतिक सरकारें अधिकारावर याव्यींत अशी हालअपेष्टांनीं गांजलेल्या जनतेमध्यें सार्वत्रिक आतुरता दिसून येते आणि तशीं सरकारें खरोखरी स्थापन झाल्यास परिस्थितींत जो कांहीं एकदम फरक पडेल तो लोकांच्या या विश्वासामुळेंच. सर्व वातावरण एकदम बदलून जाईल. आपला कोणी वाली अधिकारावर नाहीं म्हणून निमूटपणें जुलूम सोसणाऱ्या जनतेला थेट मंत्र्यापर्यंत धांव घेण्याला मोकळीक होईल; व त्यामुळेंच लांचलुचपतवाल्यांना व नफेबाजांना दहशत बसेल. आंखडत्या हातानें बाजारांत माल पाठविणाऱ्या व्यापाऱ्यांची वाढत्या किंमती मिळविण्याची आशा व आपण मिळेल तें पदरांत पाडून न घेतल्यास आपली उपासमार होईल ही लोकांची भीति या नष्ट होतील. अशा रीतीनें सांठेबाजी व संग्रहबुद्धि यांना आळा बसून त्या प्रमाणांत महागाई व टंचाई कमी होतील. अशा रीतीनें परिस्थितींत सुधारणा होईल यांत शंका नाहीं; पण हा इषारा देणें भाग आहे कीं, भरमसाट अपेक्षा उराशीं बाळगणें हें समर्थनीय व परिणामीं हितावह होणार नाहीं. राष्ट्रीय सरकार आलें म्हणजे एकदम पीक कांहीं दुप्पट होत नाहीं किंवा चलनवृद्धि पटकन कमी होत नाहीं. शरीरांत वाढलेला मेद जसा हळूं हळूंच झडावा लागतो, तसेंच चलनवृद्धीचें आहे. लांचलुचपत ही समाजाला लागलेली कीड आहे. ती लवकर मरत नाहीं. वातावरण झटकन बदलूं शकतें, पण त्या मानानें प्रत्यक्ष परिस्थितीवर परिणाम होत नाहीं याची जाणीव ठेविली पाहिजे.

हे प्रश्न बिकट पण तात्पुरते आहेत; युद्धाबरोबर ते निघून जातील ही आशा खोटी ठरेल. युद्धोत्तर काळाचे व कायम स्वरूपाचे प्रश्न कमी गंभीर अगर कमी गुंतागुंतीचे नाहींत. युद्ध संपण्यापूर्वीं राष्ट्रीय सरकार येवो वा न येवो; युद्धोत्तर कालांत तें निश्चित येईल व त्यापुढें अनेक प्रश्न दत्त म्हणून उभे राहतील. संपूर्ण परिस्थितीचा आढावा घेऊन व्यापक व योजनापूर्ण व्यवस्था करावी लागेल. शेती व आहारशास्त्र

यांची सांगड घालावी लागेल. सध्यांच्या अनुभवानें होरपळून निघाल्या-मुळें भावी युद्धाच्या अपेक्षेवरच आपली अन्यधान्यव्यवस्था उभारावयाची किंवा काय ? देशाच्या किंवा प्रांतांच्या स्वयंपूर्णतेच्या नादीं कितपत लागावयाचें ? यांसारखे मूलभूत धोरणाचे प्रश्न सोडवावे लागतील व तें सोपें नाहीं. कारण, सुरक्षिततेकडे दुर्लक्ष करणें जसें चूक, तसेंच साधन-संपत्तीचा अपव्यय करणें हेंहि चूक; व तशी जरूर नसतां, दुसऱ्या पिकाला उत्तम रीतीनें लायक अशा जमिनींत अन्नधान्य पिकविण्याचा अट्टाहास करणें हा साधनसंपत्तीचा अपव्ययच होय. लोकसंख्येंतील प्रचंड वाढीचा प्रश्न डोळे वटारून पाहत आहे. गुरांचीहि फाजील वाढ झालेली आहे. पेरणीखालीं असलेल्या दर १०० एकरांना जिथें २५ गुरें असावयास पाहिजेत तिथें ६७ आहेत. ही फाजील वाढ निरुप-योगी जनावरांची असल्यामुळें शेतीच्या कामाला तीं अपुरींच पडतात. १० एकराला एक बैल जोडी अशी सरासरी पडते. हिंदुस्थानांतील शेतकरी व त्याची जमीन दरिद्री बनली आहेत. शेती, हवामान व पाऊस पाणी यांवर फार अवलंबून आहे. यामुळेंच हिंदुस्थानांतलि अंदाजपत्रक म्हणजे पावसाबाबतची रुट्टेबाजी असें वर्णन एका फडणीसांनीं केलें होतें. या सर्व परिस्थितीमुळें हिंदुस्थानचें भवितव्य निराशामय आहे, उपासमार व दारिद्र्य यांचें वरदान हिंदुस्थानाला कायमचेंच लागलें आहे असा कांहींजण सूर काढतात; पण तो मात्र बरोबर नाहीं. आशेला भरपूर जागा व कर्तृत्वाला भरपूर वाव आहे. अधिक धान्य पिकविण्याच्या सध्यांच्या मोहिमेंत अन्नधान्याखालील जमिनीचें क्षेत्र एक कोटीपेक्षां जास्त एकरांनीं वाढलेलें आहे असें म्हणतात. तरी सुद्धां अद्यापि पेरणीलायक पण पड पडलेली अशी ९–१० कोटी एकर जमीन आहे. सरकारचे एक शेतकी तज्ज्ञ सर फिरोज खारेघाट यांनीं १०–१५ वर्षांत अन्नधान्याचें उत्पादन ५० टक्कयांनीं वाढवितां येईल असा अभिप्राय दिला आहे. त्यानंतर अलीकडे दुसरे एक तज्ज्ञ डॉ. बर्न्स यांनीं तपशीलवार चौकशी करून चांगलें बी–बियाणें व खतें यांचा उपयोग व पिकांवरील कीड, रोग

वगैरेंचा प्रतिकार यांच्या जोरावर निरनिराळ्या धान्यांच्या पैदाशींत किती वाढ करतां येईल याचा अंदाज दिला आहे; व त्यांच्या मतें तांदुळाची पैदास ३० ते ५०टक्के, गव्हाची ५०टक्के व ज्वारीची २० टक्के वाढवितां येईल. हिंदुस्थानांत बागायतीखालील जमिनीचें क्षेत्र आज अंदाजें ६॥ कोटी एकर आहे. तें जवळ जवळ दुप्पट करणें शक्य आहे. अशा तऱ्हेनें पाणी–पुरवठा वाढल्यास उत्पादनांत खूपच वाढ होऊं शकेल. निरनिराळ्या तऱ्हेचे अपव्यय टाळूनहि उत्पादन वाढवितां येईल. आज शेतकऱ्यांचें शेणखत शेतीला अत्यंत उपयुक्त असूनहि दुसऱ्या जळणाच्या अभावीं जाळलें जात आहे. जंगलांच्या कारभाराचें धोरण बदलल्यास हा अपव्यय टाळतां येणें शक्य आहे. शहरांतील कचरामैला यांचा उपयोग शेतीच्या खताकरितां मोठ्या प्रमाणावर करून घेण्यासारखा आहे. बांध–बंधाऱ्यांच्या व्यापक योजनांच्या जोरावर जमिनीचें वाहून जाणारें फूल थांबवितां येईल. सामुदायिक अगर सहकारी शेतीचे प्रयोग करून ते यशस्वी झाल्यास उत्पादनावर त्यांचा क्रांतिकारक परिणाम होईल. शेतीला दूधदुभत्याच्या धंद्याची जोड देऊन चौरस व सकस आहाराचा प्रश्न अधिक सुलभतेनें सोडवितां येईल. अशा रीतीनें नाना प्रकारची उपाययोजना करण्याचें प्रचंड कार्य राष्ट्रीय सरकारपुढें पडलेलें आहे. शास्त्राची प्रगति, कळकळीच्या सरकारची कर्तबगारी आणि जागृत झालेल्या जनतेची समंजस सहकारिता, यांच्या संगमामुळें हिंदुस्थान लवकरच समृद्धीच्या व सुखा–समाधानाच्या मार्गाला लागेल असा विश्वास बाळगण्यास हरकत नाहीं.

समाप्त

संपादक :
त्र्यं. र. देवगिरीकर

( सर्व हक्क महाराष्ट्र काँग्रेसप्रकाशन मंडळाचे स्वाधीन. )

प्रकाशक—वि. गं. केतकर, अनाथ विद्यार्थीगृह-प्रकाशन ६२४
सदाशिव, पुणें.

मुद्रक—दामोदर त्र्यंबक जोशी, बी. ए. ( टिळक ),
चित्रशाळा प्रेस, १०२६ सदाशिव पेठ, पुणें. २

# ✶ महाराष्ट्र काँग्रेस प्रकाशन ✶

## आजवर प्रकाशित झालेली पुस्तकें

(१) श्री. सी. पु. ऊर्फ आप्पासाहेब पटवर्धन—अस्पृश्यता—निवारण. (२) श्री. दा. न. शिखरे—महात्मा गांधींची देशाला देणगी. (३) श्री. अण्णासाहेब लठ्ठे—संस्थानांचा प्रश्न. (४) श्री. केशव देवधर-खादी. (५) श्री. शं. द. जावडेकर—राष्ट्रसभा व महायुद्ध. (६) श्री. प्रेमा कंटक हिंदी स्त्रियांचें जीवन. (७) बापुसाहेब गुने—अन्नधान्यप्रश्न.

पत्रव्यवहाराचा पत्ता—त्र्यं. र. देवगिरीकर,
२९१ शनवार, पुणे २.